रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १६ • अंक ८२
www.ramprahar.com

सोमवार, ९ ऑक्टोबर २०२३ • पाने ८ • किंमत ₹ २

## वर्ल्डकपमध्ये भारताची विजयी सलामी; ऑस्ट्रेलियावर मात



**चेन्नई :** विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत यजमान भारताने आपल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियावर सहा गडी राखून विजय मिळविला. भारताच्या केएल राहुल (९७*) आणि विराट कोहली (८५) यांनी अर्धशतकी खेळी केली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा डाव १९९ धावांवर संपुष्टात आला होता. भारताकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. त्याने १० षटकांत २८ धावा देत दोन षटके निर्धाव टाकली. कुलदीप यादव, जसप्रीत बुमराहने प्रत्येकी दोन, तर हार्दिक पांड्या व मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. आव्हानाचा पाठलाग करताना भारताचीही सुरुवात खराब झाली होती. रोहित शर्मा, इशान किशन, श्रेयस अय्यर खाते न खोलता बाद झाले. त्यानंतर विराट आणि राहुलने डाव सावरला.

### अंतरंग

महिला सशक्तीकरणासाठी राज्य सरकारचे अभियान/२
सायबर सुरक्षेसाठी खोपोलीत जनजागृती/५
सर्वांना अभिप्रेत खासदार रायगडात निवडून आणू/७

# आरोग्य महाशिबिरास नागरिकांचा महाप्रतिसाद

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे समाजसेवेचा धर्म -केंद्रीय मंत्री कपिल पाटील







(अधिक छायाचित्रे पान ६,८ वर..)

**पनवेल : हरेश साठे**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे समाजसेवेचा धर्म आहे. त्यामुळेच ते समाजोपयोगी उपक्रम राबवून जनसेवा करीत आहेत, असे गौरवोद्गार केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी रविवारी (दि. ८) खांदा कॉलनी येथे काढले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवड्यानिमित्ताने सीकेटी महाविद्यालयात आयोजित विनामूल्य आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार वाटप महाशिबिर यशस्वी झाले. यंदाच्या या १५व्या महाशिबिराचे उद्घाटन केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या महाशिबिराचा ११ हजार ३५२ नागरिकांनी लाभ घेतला. त्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार देण्याबरोबरच त्यांची भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती.

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले की, आम्ही महाविद्यालयात असल्यापासून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव सतत ऐकत असायचो. माणसाकडे कितीही पैसा असू दे. भूक लागली म्हणून भाकरीऐवजी पैसा खाता येत नाही आणि पैसा जास्त आहे म्हणून भुकेपेक्षा जास्त अन्न खाता येत नाही. त्यामुळे ठराविक रेषेपर्यंत पैशाला महत्त्व आहे. पैशाच्या राशीत झोपणाऱ्या माणसांपेक्षा प्रामाणिकपणे आयुष्यभर लोकं जोडण्याचे आणि लोकांची सेवा करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर करीत असतात. म्हणूनच त्यांच्या नावाला शेठ हे नाव आदराने जोडले गेले आहे. जीवन जगत असताना खऱ्या अर्थाने समाजाची सेवा कशी करावी याचे उत्तम उदाहरण रामशेठ ठाकूर आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी सांगितल्याप्रमाणे सेवा ही समर्पण धोरण मानून रामशेठ ठाकूर आणि त्यांची दोन्ही मुले कार्यरत आहेत.

रामायणाने कसं जगावे शिकवले, महाभारताने कसं जगू नये शिकवले, तर समाजाला सोबत घेऊन लोकांची सेवा करण्यासाठी कसं जगावे हे भगवद्गीतेने शिकवले आहे आणि कदाचित रामशेठ ठाकूर यांनी भगवद्गीता वाचली असेल. म्हणूनच ते अशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. जीवनाला पूर्णत्वास नेण्यासाठी दोन पैलू आहेत. आपण परमेश्वराचे रूप आहोत आणि जगात सर्वत्र परमेश्वर आहे ही भावना ठेवून जगात जनार्दन शोधण्याचे काम करतो तोच अशा प्रकारचे उपक्रम राबवू शकतो. म्हणून सामाजिक संवेदनेने जो काम करतो तो उपचाराने बरा झालेल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरच्या आनंदाने आनंदित होतो आणि हा आनंद सामाजिक सेवेच्या माध्यमातून रामशेठ ठाकूर आणि त्यांचे सर्व सहकारी मिळवत आहेत. समाज सर्वांगसुंदर आणि उन्नत बनवायचा असेल, तर जी कर्तव्य आपल्याला पार पाडायची आहेत ती पार पाडताना धर्माचे आचरण आपण करतो. म्हणून सेवेचा धर्म आत्मसात करतो तो खरा धर्म आहे. रस्ता सुंदर असेल तर रस्ता कुठे जातो विचारले पाहिजे, पण धेय जर सुंदर असेल तर रस्ता कुठे जातो विचारायची गरज नसते. लोकं आपोआप तुमच्या मागे चालायला लागतात आणि त्या अनुषंगाने रायगडमध्ये ध्येय चांगले ठेवून रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संस्था काम करीत आहे. त्यामुळे समस्त समाज रामशेठ ठाकूर यांच्या पाठीशी राहून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करीत आहे आणि ही उल्लेखनीय बाब असल्याचे केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी अधोरेखित केले.

ना. पाटील यांनी पुढे सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणली. या माध्यमातून १३०० आजारांवर पाच लाख रुपयांपर्यंत उपचार करण्याची व्यवस्था पंतप्रधान मोदींनी देशातील नागरिकांसाठी केली. ही योजना अमेरिकेने राबवली, मात्र ते यशस्वी झाले नाहीत. भारतात मोदीजींनी ही योजना राबवली व आतापर्यंत २५ कोटी कार्डांचे वाटप करीत यशस्वी केली. जगावर कोरोनाचे संकट आले आणि या संकटात भारत नष्ट होईल की काय अशी चिंता सर्व प्रगत देशांनी व्यक्त केली, कारण परदेशात तयार झालेली लस भारतात यायला १० वर्षे लागायची, परंतु तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत आणि आपल्या देशातील शास्त्रज्ञांच्या क्षमतेवर जगात सर्वांत प्रथम लस बनवण्याचे काम आपल्या देशाने केले. भारतात २०० कोटी डोस देण्याचे काम आपल्या सरकारने केले. त्याचबरोबर जगाच्या पाठीवर १२० देशांमध्ये आपण लसीचा पुरवठा केला आणि त्या लोकांचेही प्राण वाचविण्याचे काम माणुसकीच्या दृष्टिकोनातून पंतप्रधान मोदींनी केले.

केंद्र सरकारच्या माध्यमातून देशामध्ये अडीच लाख वेलनेस सेंटरची उभारणी झाली. शहराप्रमाणे देशातील प्रत्येक गावात सर्व सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत यासाठी मोदी सरकार प्रयत्नशील असून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील गाव घडविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत असल्याचेही ना. पाटील यांनी सांगितले.

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची काम करण्याची पद्धत, देशाला आणि राज्याला विकसित करण्याचे व गोरगरिबांचे अश्रू पुसण्याचे कार्य ही पद्धत अंगिकारली आहे. नामदार कपिल पाटील हे सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले, मात्र मेहनतीने पुढे आलेले नेतृत्व आहे. देशाच्या प्रगतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ते काम करीत आहेत. नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटीलसाहेबांचे नाव देण्यासाठी त्यांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. थोड्या दिवसांतच 'दिबा'साहेबांचे नाव विमानतळाला मिळेल, असे या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात ठामपणे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जगावर आलेल्या कोरोना महामारीला पराभूत करण्यासाठी लसीची निर्मिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आपल्या देशात झाली. पीपीई किट, मास्क आपल्या देशात तयार होत नव्हते. त्याचीही निर्मिती झाली. आपल्या देशाला या महाभयंकर रोगापासून वाचविण्याबरोबर इतर देशांनाही संकटातून वाचविण्याचे काम झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व जगाने मान्य केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाचे कार्यक्रम सतत राबविले जात असल्याचे सांगून यासाठी आपणा सर्वांची मदत मोलाची असते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी केले. त्यांनी दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या महाशिबिरासंदर्भात माहिती देताना आढावा मांडला. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत महाशिबिराचे आयोजन करण्यात आले असून या महाशिबिराचा संपूर्ण खर्च श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने केल्याचे त्यांनी सांगितले.

या महाशिबिरास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आगरी समाजाचे भिवंडी अध्यक्ष अरुण पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीता पाटील, पनवेल मंडल सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, अमोघ ठाकूर, **(पान २ वर..)**

### लोकांची सेवा हाच धर्म -लोकनेते रामशेठ ठाकूर

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची १९९६ साली स्थापना झाली तेव्हापासून आजपर्यंत अखंडपणे समाजसेवेचे व्रत सुरू आहे. या माध्यमातून वर्षभर आपण समाजोपयोगी उपक्रम राबवत असतो. लोकांच्यात सतत राहणे आणि त्यांची सेवा करणे आपला धर्म आहे. त्या अनुषंगाने वाटचाल करताना कार्यकर्ते, हितचिंतकांची मोलाची साथ मिळत असते. म्हणून आपण हे समाजसेवेचे उपक्रम यशस्वी करीत असतो.

### लोकांच्या अंधारलेल्या वाटा प्रकाशमय करण्याचे काम -आमदार गणेश नाईक

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर मुळातच गुरुवर्य असल्याने दया, क्षमा, शांती या गोष्टीची शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. समाजकार्य, राजकारण क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळविले. स्वतःचे जीवन घडवताना समाजाच्या अडीअडचणी ओळखून समाजातील रंजल्या गांजलेल्या घटकांना सर्व स्तरावर मदतीचा हात देण्याचे काम रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून झाले. आरोग्यसेवेच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यामध्ये भूतकाळात एवढे मोठे महाशिबिर झाले नाही आणि हे करताना विनम्रता आहे. रामशेठ ठाकूर यांच्या कुटुंबात जन्म घेतलेले आमदार प्रशांत ठाकूर अतिशय संयमी, विवेकी, सर्वगुणसंपन्न असून जीवन कृतार्थ करण्याच्या अनुषंगाने पाऊल टाकणारी ही पिढी आहे. प्रत्येक जण आपला संसार चांगला व्हावा, मुले सुशिक्षित व्हावीत यासाठी प्रयत्नशील असतो, मात्र रामशेठ ठाकूर यांनी लोकांच्या अंधारलेल्या वाटांना सेवेरूपपणे प्रकाशमय करण्यासाठी प्रशांत आणि परेशलाही वारसा दिला आहे आणि दुसऱ्याचे दुःख हलके करण्यासाठी अविरतपणे काम सुरू आहे.

> **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या संकल्पनेनुसार हे आरोग्य महाशिबिर आयोजित करण्यात आले. त्यांनी पंतप्रधान म्हणून ज्या दिवशी सूत्रे हाती घेतली त्या दिवसापासून देशातील प्रत्येक नागरिकाचा विचार करून योजना अंमलात आणल्या आणि त्यामुळे देशाच्या प्रगतीला चालना मिळाली. देशाचा विकास आणि आरोग्य व्यवस्था याच्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.**
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

## विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्याचा प्रस्ताव पंतप्रधान कार्यालयास सादर

### केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची माहिती



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्रीय एव्हिएशन विभागाकडे पाठविला होता. त्या विभागाकडून हा प्रस्ताव पंतप्रधान कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी रविवारी (दि. ८) वाशी येथे दिली. ते लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीत बोलत होते. यामुळे विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्यासाठी एक पाऊल पुढे पडले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासंबंधीचा ठराव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला होता. शासकीय प्रक्रियेनुसार राज्य शासनाला याबाबतचा ठराव मंजूर करून तो केंद्र शासनाकडे पाठवावा लागतो. त्यानुसार कॅबिनेटमध्ये ठराव मंजूर झाला, मात्र हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला नसल्याची चर्चा होती. याबाबत कृती समितीने सातत्याने बैठका घेत राज्य शासनाकडे पत्रव्यवहार सुरू ठेवला. त्यास यश आले असून हा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवला आहे.

वाशीत झालेल्या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार राजू पाटील, माजी खासदार संजीव नाईक तसेच दशरथ भगत यांच्यासह सर्वपक्षीय नेते, विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. यापुढे केंद्र शासनाकडे कशा पद्धतीने पाठपुरावा करायचा याबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.

## उत्तम नियोजन आणि दर्जेदार व्यवस्थेने शिबिरार्थी भारावले

### लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले धन्यवाद



**पनवेल : नितीन देशमुख**


खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ, भारतीय जनता पक्ष आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ८) विनामूल्य आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार वाटप महाशिबिर आयोजित करण्यात आले होते. या महाशिबिराचे उत्तम नियोजन करण्यात आले होते तसेच येथील व्यवस्थाही दर्जेदार होती. त्याबद्दल या महाशिबिराचा लाभ घेण्यासाठी आलेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त करून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवकांना धन्यवाद दिले.



मी त्वचारोग तपासणीसाठी आले होते. येथे खूप छान माहिती डॉक्टरांनी दिली. तपासणी झाल्यानंतर औषधांचीही व्यवस्था होती. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या शिबिरात चांगली व्यवस्था ठेवली. येथील स्वयंसेवक आलेल्या लोकांना नीटपणे मार्गदर्शन करीत होते.
**-मीना लोंढे, कळंबोली**




मी हाडांची तपासणी करण्यासाठी आलो होतो. नोंदणी केल्यापासून येथील स्वयंसेवकांनी योग्य मार्गदर्शन केले. डॉक्टरांनीही व्यवस्थित तपासणी करून काय काळजी घ्यायला पाहिजे हे सांगून औषधे दिली. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना देऊ तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.
**-श्रीकांत गुजर, नेरे**



महिलांसाठी कर्करोग तपासणी ही फार गरजेची आहे. त्याची उत्तम सोय येथे करण्यात आली होती. येथील व्यवस्थाही चांगली होती. आमदार प्रशांत ठाकूर महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे उत्तम कार्य करीत आहेत. त्यामुळे त्यांना व त्यांच्या टीमला धन्यवाद.
**-रिमा कनगुटकर, खांदा कॉलनी**



रामाच्या स्तोत्रात ज्याप्रमाणे रामाची सेना काम करते असे आपण ऐकतो त्याप्रमाणे या आरोग्य महाशिबिरात रामसेना काम करताना दिसून आली. येथे मोठ्या प्रमाणात आलेल्या लोकांच्या विविध तपासण्या व्यवस्थित झाल्या. लोकनेते रामशेठ आणि आमदार प्रशांत ठाकूर यांना दीर्घायुष्य लाभो हीच प्रार्थना.
**-प्रभा सिन्हा, नवीन पनवेल**



आरोग्य शिबिरात व्यवस्था उत्तम होती. नोंदणी केल्यानंतर कोणतीही अडचण न येता ज्या डॉक्टरांकडे तपासणीसाठी जायचे आहे तेथे पोहचता येत होते. डॉक्टरही व्यवस्थित माहिती विचारून तपासणी करीत होते. त्यामुळे बाहेर येताना रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. औषधेही मोफत दिली गेली. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांना खूप खूप धन्यवाद!
**-निलाक्षी थवई, नवीन पनवेल**



मी माझ्या कुटुंबासह या आरोग्य महाशिबिरात तपासणीसाठी सकाळी ८ वाजल्यापासून आले होते. त्यामुळे घरी जाऊन जेवण करावे लागणार होते, परंतु इथे जेवणाचीही व्यवस्था केल्याचे समजले. चांगले जेवण होते. आज मोफत तपासणी झालीच, शिवाय जेवणही मिळाले. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांना खूप धन्यवाद.
**-रितू यादव, देवद**

आमचे डॉक्टर आणि इतर स्टाफ असे एकूण ३५ जण या आरोग्य शिबिरात सहभागी झालो होतो. येथे प्रत्येक काम व्यवस्थित सिस्टीमप्रमाणे केले जात होते. विविध तपासण्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था असल्याने गर्दी वा गोंधळ नव्हता. त्यामुळे काम करायला सोपे गेले.
**-डॉ. सचिन चोखटकर, येरळा मेडिकल कॉलेज, खारघर**

# महिला सशक्तीकरणासाठी सरकारचे अभियान

## राज्यातील एक कोटी महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न

**मुंबई : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी अभियानाच्या धर्तीवर राज्य सरकारने महिला सशक्तीकरण हे नवे अभियान जाहीर केले आहे. राज्यातील एक कोटी महिलांना या अभियानातून लाभ देण्यात येणार असून त्यासाठी जिल्हा वार्षिक योजना, आमदार निधी, विविध शासकीय योजनांचा निधी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी अभियानाच्या प्रचार, प्रचार व नियोजनासाठी वापरण्यात येणार आहे.

शासन आपल्या दारी हे मुख्यमंत्र्यांचे अभियान यशस्वी होत आहे. त्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांच्या मोठ्या




सभा मेळाव्याच्या नावाखाली होत आहेत. त्याच धर्तीवर आता महिलांसाठी विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानात महिलांसाठीच्या योजना राबवणारे शासकीय सर्व विभाग एका छताखाली आणले जाणार आहेत. या अभियानाचा शासन निर्णय २० सप्टेंबर रोजी काढण्यात आला होता, मात्र दुसऱ्याच दिवशी तो रद्द करण्यात आला. शुक्रवारी सुधारित शासन निर्णय जारी केला आहे.

### निधीचे वितरण

***या अभियानासाठी प्रत्येक आमदारांच्या निधीतून २० लाख रुपये घेतले जातील. महापालिका, पंचायत समिती व नगरपंचायती यांच्याकडी राखीव पाच टक्के निधी तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांकडील राखीव १० टक्के निधी या अभियानासाठी वापरण्यास मुभा असणार आहे, तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून एक टक्का निधी वापरण्यास जिल्हाधिकारी यांना मंजुरी दिली आहे.***

या अभियानाची धुरा मुख्यमंत्री कार्यालयातील जनकल्याण कक्षाकडे देण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रात आयुक्त आणि ग्रामीण भागात जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी या अभियानाचे नोडल अधिकारी असणार आहेत.

आरोग्य शिबिरे, प्रशिक्षण शिबिरे, रोजगार मेळावे, सखी किटवाटप, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रोत्साहनपर पारितोषिके देणे असे कार्यक्रम या अभियानात असणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यास २५ हजार महिलांना लाभ देण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहे.

# 'मिशन इंद्रधनुष्य'ची तिसरी फेरी

**नवी मुंबई : बातमीदार**



केंद्र सरकारने डिसेंबर २०२३पर्यंत गोवर रूबेला आजाराचे दूरीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून त्या दृष्टीने ऑगस्ट महिन्यापासून तीन फेऱ्यांमध्ये विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याकरिता नवी मुंबई महापालिकेने इतर सर्वच मोहीमांप्रमाणे हा कार्यक्रमही यशस्वीरित्या राबविण्याकडे लक्ष केंद्रित केले असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.

लसीकरण हे बालकांमधील मृत्यू व आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी एक प्रभावी माध्यम असून अर्धवट लसीकरण झालेली तसेच लसीकरण न झालेली बालके ही पूर्ण लसीकरण झालेल्या बालकांच्या तुलनेत लवकर आजरी पडतात किंवा मृत्यू पावतात असे नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणामध्ये आढळून आलेले आहे. त्या अनुषंगाने ऑक्टोबर महिन्यापासून राबविली जाणारी तिसरी फेरी अत्यंत महत्त्वाची आहे. या मोहिमेचे महत्त्व लक्षात घेत नवी मुंबई पालिका आरोग्य विभागाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन केले आहे. विशेष मिशन इंद्रधनुष ५.०ची तिसरी फेरी ९ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

याबाबत लसीकरण टास्क फोर्स समितीच्या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इंडियन मेडीकल असोसिएशन, इंडियन असोसिएशन ऑफ पिडियाट्रीक, एकात्मिक बालविकास विभाग यांचे प्रतिनिधी जागतिक आरोग्य संघटना, महापालिकेच्या सर्व रुग्णालयांचे प्रमुख तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत अपेक्षित लाभार्थ्यांच्या यादीतील प्रत्येक लाभार्थ्यावर लक्ष केंद्रीत करून शंभर टक्के उद्दिष्टपूर्तीकरिता प्रत्येक वैद्यकीय अधिकारी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह संपूर्ण क्षमतेने काम करावे निर्देश वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ प्रशांत जवादे यांनी दिले. विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.०च्या अनुषंगाने सर्व वैद्यकीय अधिकारी, एनएम, एलएचव्ही, एएनएम, शाळा समन्वयक व आशा स्वयंसेविकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे, तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय कृती आराखडाही तयार करण्यात आलेला आहे. अंगणवाडीसेविकांची सभा घेण्यात आली असून लसीकरणाच्या ठिकाणी येणाऱ्या बालकांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

या मोहिमेतील उपक्रमाचा जास्तीत जास्त बालकांना लाभ मिळावा यासाठी व्यापक प्रचार, प्रसिद्धीवर भर दिला जाणार असून महापालिका क्षेत्रात माईकींगद्वारे मोहिमेची माहिती प्रसारित केली जात आहे. त्याचप्रमाणे नागरी आरोग्य केंद्रातील आशा स्वयंसेविकामार्फत घरोघरी भेट देण्यात येऊन लाभार्थ्यांना लसीकरणाकरिता बोलविण्यात येणार आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी गणेशोत्सव काळात पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन केले जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संस्थेच्या माध्यमातून गणेशोत्सव काळात पर्यावरण पूरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या गणेशोत्सव स्पर्धेला भाविक भक्तांचा चांगला प्रतिसाद लाभला.

पूर्व विभागातून स्पर्धेत प्रथम क्रमांक भास्कर धनाजी मोकल (चिरनेर), द्वितीय क्रमांक अभय काशिनाथ पाटील (कोप्रोली)तर तृतीय क्रमांक प्रफुल्ल केणी (भोम) यांनी पटकविला, तर उरण



विभागातून प्रथम क्रमांक समीर पाटील (करंजा रोड), द्वितीय क्रमांक सुरज मोरे (बोरी) तर तृतीय क्रमांक हर्ष पवार (पेन्शनर्स पार्क, उरण) यांनी पटकाविला. या सर्व विजेते उमेदवारांच्या घरी जाउन श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना सन्मानचिन्ह शाल, श्रीफळ देऊन त्यांचा गौरव केला.

# 'ईडी'चे मुंबईसह पाच ठिकाणी छापे

**मुंबई :** महादेव बेटिंग ॲपप्रकरणी ईडीने मुंबईतील चित्रपट निर्मिती संस्थेशी संबंधित ठिकाणांवर शनिवारी छापेमारी केली आहे. या चित्रपट निर्मिती संस्थेला महादेव ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल यांच्याकडून आर्थिक मदत मिळाल्याचा ईडीला संशय आहे.

याबाबत अंधेरीतील चित्रपट निर्मिती संस्थेच्या ठिकाणावर शोधमोहीम राबवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी मुंबई, छत्तीसगड, दिल्ली या ठिकाणीही ईडीने शोधमोहीम राबवली. या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान ५०हून अधिक बेटिंग ॲप्लिकेशन सुरू असल्याची माहिती ईडीला मिळाली आहे. ॲपच्या प्रमोशनसाठी अनेक कलाकारांसह परदेशी खेळाडूंनीही जाहिराती केल्या आहेत. यापूर्वी या प्रकरणी रणबीर कपूर, श्रद्धा कपूरसारख्या सेलिब्रिटींना ईडीने तपासासाठी समन्स धाडले होते.

# उरणमधील हरविलेली मुस्कान सापडली

**उरण : बातमीदार**

उरण येथील बेपत्ता मुलगी मुस्कान नवनित चौधरी (वय १३) मागील दहा ते पंधरा दिवसांपासून बेपत्ता झाली होती. तिचा पोलिसांनी शोध घेत तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे.



मुस्कान नवनित चौधरी ही गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता होती. ४ ऑक्टोबर रोजी दुपारी मुस्कानच्या आईच्या मोबाईलवर एक अनोळखी नंबरवरून फोन आला व त्यांनी मुस्कानची थोडक्यात माहिती घेतली व फोन बंद केला. मुस्कानच्या आई-वडिलांनी पोलीस प्रशासनाला संपर्क करून फोन केलेल्या व्यक्तीचा नंबर दिला. पोलिसांनी माहिती घेतली असता हा नंबर जळगाव येथील असल्याचे पोलिसांना समजले. त्यानंतर लागलीच पोलिसांनी वरिष्ठांची परवानगी घेऊन जळगाव येथे रवाना झाले. तेथे मुस्कान चौधरी ही एका बालिकाश्रमात असल्याचे आढळले. मुस्कानचे आई-वडील रागावल्याने वृंदावन, मथुरा, उत्तर प्रदेश येथे रेल्वेने जात होती, मात्र रेल्वे पोलिसांनी मुस्कान एकटी दिसल्याने तिला भुसावळ रेल्वे जंक्शन येथून ताब्यात घेऊन जळगावमधील बालकाश्रमामध्ये दाखल केल्याचे उरणच्या पोलिसांना समजले. मुस्कान चौधरी ही सुखरूप तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

मुस्कानचे आई-वडिलांनी हरविलेली मुलगी मुस्कान सापडल्याबद्दल पोलिसांचे तसेच पत्रकार विठ्ठल ममताबादे यांचे आभार मानले आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम उरण पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सुरज कांबळे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, पोलीस हवालदार बलदेव अधिकारी, पोलीस शिपाई रियाज शेख, महिला पोलीस शिपाई वैशाली पाटील यांनी सदरचा गुन्हा तपासून मुलीचा शोध यशस्वीपणे घेतला आहे. सर्व नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक केले आहे.



**कर्जत : आमदार महेंद्र थोरवे यांनी चांधई गाव येथील शिवसेनेचे उपशाखाप्रमुख दिनेश शिनारे यांच्या निवासस्थानी २१ दिवसांच्या गणरायाचे दर्शन घेतले. सोबत कुटूंबीय आणि गावातील रहिवाशांतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# रायगड जिल्हा कौशल्य विकास केंद्रात ग्रंथालय अभ्यासिका उपलब्ध

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग येथे करिअर विषयक साहित्य, ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका योजना उपलब्ध आहे.

ही योजना राज्य शासनाची असून बदलत्या आर्थिक व्यवस्थेमुळे पारंपरिक नोकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. बहुतेक बेरोजगार तरुणाला रोजगाराच्या नवनवीन संधीबाबतची माहिती नसल्याने तथा त्यास अनुरूप पात्रता ते धारण करीत नसल्याने मोठया संख्येने राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील उमेदवार हे रोजगारापासून वंचित राहतात. यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग या कार्यालयात बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य, स्पर्धा परिक्षांची माहिती देणारी मासिके, पुस्तके इ. उपलब्ध करुन देणे, अभ्यासिकेची व्यवस्था करणे, नवीन नवीन संधींची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देणे या उद्देशाने ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीम.अ.मु. पवार यांनी दिली आहे.

या ग्रंथालय सदृश्य अभ्यासिकेत विविध विषयांवरील स्पर्धापरिक्षांकरिता उपयुक्त असलेली पुस्तके, मासिके तसेच सर्व प्रकारची वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना विनामूल्य वाचनास उपलब्ध आहेत. ही पुस्तके वाचण्यासाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष उपलब्ध आहे. यामध्ये बसून मुलांना ही पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यासाठी विद्यार्थ्यांस स्वतंत्रपणे टेबल व खुर्च्यांची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

कार्यालयीन वेळेत विद्यार्थी येथे दिवसभर बसून पुस्तके वाचू शकतात. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय तसेच स्वच्छतागृह येथे उपलब्ध आहे. ग्रंथालयसदृश्य अभ्यासिका व करिअर विषयक मार्गदर्शन या सुविधा विद्यार्थ्यांना विनामूल्य पुरवल्या जातात.

जिल्ह्यातील सर्व बेरोजगार तरुण/तरुणींनी या विनामूल्य शासकीय योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ. मु. पवार यांनी केले आहे.

# चिरनेरमध्ये आदिवासी महिलांना साडीवाटप



**उरण : वार्ताहर**

श्री दुर्गा परमेश्वरी मंदिर घाटकोपर मुंबई, सतीश सालियन, राजन देसाई यांच्यातर्फे चिरनेरमधील आदिवासी महिलांना साडी, भांडीवाटप करण्यात आले. हे साहित्य आकाश फाउंडेशन मुंबईच्या सेक्रेटरी संजिवनी शृंगारे, आशा माळी, नम्रता म्हात्रे यांच्यामार्फत सारडे विकास मंचाकडे देण्यात आले.

साहित्याचे वाटप चिरनेर वाडीवरील आदिवासी महिलांना करण्यात आले. सदाबहार दोस्ती ग्रुपतर्फे मुलांना खाऊवाटप सोबत महिलाना भांडी देऊन नवरात्रीच्या आधीच सुंदर भेट देण्यात आली. सतीश सालियान, राजन देसाई यांचे या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी सदाबहार दोस्ती ग्रुप चे हरीश म्हात्रे, कामेश्वर म्हात्रे, संतोष जोशी, जितेंद्र म्हात्रे, कैलास पाटील, तुकाराम गावंड, सचिन पाटील, सई म्हात्रे, स्नेहित पाटील, नक्ष पाटील, अनूश पाटील यांचे सहकार्य लाभले.

चिरनेर वाडीवरील शिक्षक सन्नी बोरसे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून सतीश सालीयन आणि राजन देसाई यांना धन्यवाद दिले. सर्व मान्यवरांचे शेवटी सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी आभार मानले.

## पान १ वरुन

### आरोग्य महाशिबिरास नागरिकांचा महाप्रतिसाद

कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, व्यापार आघाडी संयोजक कमल कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या महाशिबिरास स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत तसेच प्रतिभा भोईर, लीना पाटील, शिल्पा म्हात्रे, ज्योती भोपी, नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, वर्षा म्हात्रे आदी महिलावर्गही हजर होता.

आरोग्य महाशिबिरात सर्वसाधारण रोग, बालरोग, महिलांचे आजार, त्वचारोग, हृदयरोग, दंतरोग, हाडांचे रोग, ईसीजी, मधुमेह, नाक-कान-घसा, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, क्षयरोग, कॅन्सर अशा विविध प्रकारच्या तसेच सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या तज्ज्ञांमार्फत करून सल्ला आणि औषधोपचार मोफत करण्यात आले. त्याचबरोबर डोळ्यांची तपासणी व चष्मेवाटप तसेच अपंगांना तीनचाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. या वेळी आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अवयवदानाचे फॉर्म भरण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली होती.

आरोग्य महाशिबिर यशस्वी करण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन तसेच जे.जे. हॉस्पिटल मुंबई, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट पनवेल, एमजीएम हॉस्पिटल कामोठे व कळंबोली, डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल नेरूळ, भारती विद्यापीठ खारघर, मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरूळ, येरळा मेडिकल ट्रस्ट, साईट फर्स्ट केअर, नायर हॉस्पिटल, व्हिट सेंटर पनवेल, शंकरा आय हॉस्पिटल, सत्य साई संजिवनी हॉस्पिटल खारघर या नामांकित वैद्यकीय संस्थांचे एकूण ५३६ वैद्यकीय तज्ज्ञ व त्यांचे सहकारी, स्थापित करण्यात आलेल्या ३५ कमिट्यांचे पदाधिकारी सदस्य, कार्यकर्ते, स्वयंसेवकांचे योगदान लाभले. सर्वांच्या योगदानातून महाशिबिर यशस्वी झाल्याचे पहावयास मिळाले.

# 'लायन्स'तर्फे कॅन्सरग्रस्त मुलांना शिधावाटप



**पनवेल : वार्ताहर**

लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ चाईल्ड कॅन्सर कमिटीतर्फे आसाम भवन येथील मुलांना तीन महिने पुरेल असा शिधावाटप करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल ए. के. शर्मा, एन. आर. परमेश्वरन, संजीव सुर्यवंशी, माजी प्रांतपाल मुकेश तनेजा आणि डिस्ट्रिक्ट चाईल्ड कॅन्सर कमिटी चेअरमन संजय गोडसे उपस्थित होते. संजय गोडसे यांनी उपक्रमाचा उद्देश सांगितला आणि डिस्ट्रिक्टमधील १८ क्लबने सहभाग दिल्याचे सांगितले आणि या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या सर्व क्लब आणि व्यक्तींचे आभार मानले.

कमिटी सल्लागार मुकेश तनेजा यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. मुख्य अतिथी ए. के. शर्मा यांनी सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम गरजेचे आहेत आणि चाईल्ड कॅन्सर कमिटी संजय गोडसे यांच्या नेतृत्वाखाली बहुमोल कार्य करीत आहेत. सर्व सहभागी क्लब आणि व्यक्तींना ए. के. शर्मा यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला लायन्स क्लब ऑफ तुर्भे, पनवेल आणि पनवेल सरगम यांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी डिस्ट्रिक्टचे पदाधिकारी तसेच क्लबचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आसाम भवनच्या वतीने लायन परिवाराचे आभार मानले.

## दुखवटा

### निशिकांत देशपांडे



**चौक :** गावचे ज्येष्ठ शिवसैनिक निशिकांत मधुकर देशपांडे यांचे वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले. त्यामुळे येथील शिवसैनिक यांच्यावर दुःखाची छाया पसरली आहे. शिवसेनेचा प्रसार करण्यासाठी आदिवासी भागात त्यांनी विशेष काम केले. त्यांच्या अंत्यविधीस अनेक राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांचे दशक्रिया विधी १३ ऑक्टोबर रोजी तमनाथ (कर्जत) येथे होणार असून उत्तरकार्य १६ ऑक्टोबर रोजी चौक येथील त्यांच्या राहत्या घरी होतील, असे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

# सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रम

## ‘भाविप’ पाठविणार १० हजार दिवाळी फराळाचे बॉक्स

**पनवेल : वार्ताहर**

‘सैनिक हो तुमच्यासाठी’ हा भारत विकास परिषद, पनवेल शाखेचा प्रमुख प्रकल्प आहे, जो गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे आणि या उपक्रमामध्ये उत्तरोत्तर प्रगती होत आहे. यंदाच्या वर्षी सीमेवर रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी १० हजार फराळाचे बॉक्स पाठवणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

भारत विकास परिषद ही एक राष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आहे जी १९६३ पासून स्वस्थ, समर्थ आणि संस्कृत भारत निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. भारत विकास परिषदच्या देशभरात १,५०० पेक्षा जास्त शाखा आणि १,५०,००० पेक्षा जास्त सदस्य आहेत. भारत विकास परिषदेची सर्व माहिती www.bvpindia.com वर उपलब्ध आहे. पनवेल शाखेची स्थापना २०१९ साली झाली आणि २०२० मध्ये दिवाळीच्या निमित्ताने, भारत



विकास परिषदेने या नवीन प्रकल्पाची सुरुवात केली व संकल्पनेला आपले ध्येय बनवले. सीमेवरील आपल्या सैनिकांना काही मिठाई (लाँग शेल्फ-लाइफ पौष्टिक लाडू) पाठवण्याचा निर्णय घेतला. कोव्हिडचा काळ असल्याने, सर्व खबरदारी घेत, त्यांनी जवानांना आमच्या सदस्यांनी लिहिलेल्या कवितांसह, हाताने बनवलेले १४,००० पौष्टिक लाडू या कठीण काळातही पाठवण्यात ते यशस्वी झाले. ज्यांच्या कष्टामुळे आपण घरी शांतपणे झोपू शकतो त्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या या उपक्रमाचे लष्करानेच नव्हे तर पनवेलच्या प्रतिष्ठित नागरिकांनीही

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रमाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी भेट देत नितीन कानेटकर, डॉ. किर्ती समुद्र, ज्योती कानेटकर, सुबोध भिडे यांच्याकडून सविस्तर माहिती घेत कौतुक केले.**

कौतुक केले आणि त्यामुळे भारत विकास परिषदने हा प्रकल्प वाढत्या उत्साहाने सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वाढत्या पाठिंब्यामुळे भारत विकास परिषदने मातृभूमीच्या विविध सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना १० हजार फराळाचे बॉक्स सीमेवर पाठवण्याचे लक्ष्य भारत विकास परिषद पनवेल ठेवले आहे.

यासाठी ६०० किलो चिवडा, ६०० किलो शेव, ४५० किलो चकली आणि १० हजार लाडू आले आहेत. येत्या दोन दिवसांत हे सर्व पदार्थ बॉक्समध्ये भरून सोमवार ते गुरुवारपर्यंत रेल्वे पार्सल तसेच एयर कार्गो मार्फत भारतीय लष्कराच्या आर्मी कॅम्पवर पोहचवण्यात येतील त्यानंतर आर्मी ऑफिसर्स पदार्थांची चाचणी करून प्रत्यक्ष हायर कॅम्प बॉर्डरवरच्या जवानांना ही पार्सल पाठवतील. या सर्व प्रक्रियेसाठी अंदाजे १० ते १५ दिवस लागतात. यासाठी उदात्त भावनेने पाठविलेली देणगी भारत विकास परिषदेच्या प्रांताच्या अकाऊंटमध्ये जमा होते आणि प्रांत कार्यालयातर्फे सर्व वेंडर्सना त्वरित पैसे अदा केले जातात याद्वारे पारदर्शकतासुद्धा जपण्यात येते.

## पनवेल महापालिका हद्दीत दप्तरविना शाळा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या १ ते ११ शाळांमध्ये शनिवारी (दि. ७) दप्तरविना शाळा उपक्रम राबविण्यात आला. दरमहा पहिल्या शनिवारी व चौथ्या शनिवारी महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये हा नाविन्यपूर्ण उपक्रम घेतला जातो. या उपक्रमाची सुरवात सुंदर परिपाठाने केली जाते. या उपक्रमाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळतो. न घाबरता बिनधास्तपणे सर्व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत असतात.

या उपक्रमांतर्गत विविध खेळ जसे की बुद्धिबळ, कॅरम, कवायत, योगासने, संगितखुर्ची, तळ्यात मळ्यात घेतले जातात. तसेच डिजिटल बोर्डवर विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या उपयोगी असणारे चित्रपट दाखविण्यात आले.याबरोबरच गायन, नृत्य नाट्यीकरण,वादविवाद यासाठी शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कविता ,पाढे पाठ होतातच पण निडरपणेपुढे येऊन सादरीकरणातून आत्मविश्वास वाढतो.

अतिरिक्त आयुक्त भारत राठोड आणि प्रशासन अधिकारी किर्ती महाजन यांच्या सूचनेनुसार सर्व पालिकेच्या शाळांमध्ये ’दप्तर विना शाळा उपक्रम’ घेतला जात आहे.

## निवडक

### तरुणीवर अतिप्रसंग करणारा ताब्यात

**पनवेल :** मैत्रीचा फायदा घेऊन एका २० वर्षीय तरुणीला निर्जनस्थळी नेऊन तिच्या अतिप्रसंग करणाऱ्या तरुणाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पनवेल परिसरातील मॅरेथॉन भागात राहणाऱ्या एका २० वर्षीय तरुणीसोबत आरोपी ढोलू सिंग राजपूत याची ओळख झाली. या ओळखीचा फायदा घेत ती कामावरून पनवेल स्टेशन येथून घरी परतताना त्याने तिला आपल्या मोटरसायकलीवर घेऊन घरी न सोडता तिला जेएनपीटी मार्गावर वरील निर्जन स्थळी नेऊन तिच्यावर अतिप्रसंग केला. याबाबत सदर तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करताच पोलिसांच्या पथकाने आरोपीस मेडिकल स्टोअर येथून ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहेत.

### जेवायला गेलेला व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून मित्रासोबत जेवायला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विनोद उर्फ विनायक महादेव घोटकर (वय ३२) असे या बेपत्ता व्यक्तीचे नाव असून, उंची पाच फुट सहा इंच, रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, बांधा मध्यम, केस काळे, डोळे काळे असून अंगात सफेद शर्ट निळी जिन्स घातलेली आहे. व त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास रबाळे पोलीस ठाणे किंवा पोहवा संदीप नवले यांच्याशी संपर्क साधाव, असे आवाहन करण्यात आले आहे.


### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे ५० ते ५५ वर्ष, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट, डोक्याला टक्कल पडलेला, दाढी वाढलेली, केस काळे पांढरे वाढलेले, वाढलेले, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, अंगात निळा स्वेटर, निळी फुल पॅन्ट असे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### करंजाडेतील ज्वेलर्समध्ये चोरी

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमधील एका ज्वेलर्स दुकानात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून रोख रकमेसह सोन्या चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. करंजाडे सेक्टर ६, अनमोल आश्रय सोसायटीमध्ये असलेल्या अनिता ज्वेलर्सच्या पाठीमागे असलेल्या खिडकीतून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून तेथे असलेली रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने असा ऐवज चोरून नेला आहे. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रेल्वेसंबंधी विकासकामातून रोजगारासाठी धुतूम येथील प्रकल्पग्रस्त करणार उपोषण



**उरण : बातमीदार**

धुतूम गावातील शेमटीखार शेतकरी श्रमिक कल्याणकारी सामाजिक संख्येच्या वतीने सोमवार (दि. ९)पासून रांजणपाडा रेल्वेस्थानकाजवळ बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. ही माहिती शेमटीखार शेतकरी श्रमिक कल्याणकारी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विनोद अशोक ठाकूर यांनी दिली.

उरण तालुक्यातील धुतूम ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या रांजणपाडा रेल्वेस्थानक व रेल्वेशी संबंधित विविध विकासकामे सुरू आहेत. या रेल्वेस्थानकात व रेल्वेशी संबंधित विविध विकासकामांमध्ये धुतूम गांवातील प्रकल्पग्रस्तांना नोकरीत, रोजगारात स्थान मिळावे अशी मागणी आहे. धुतूम गावातील प्रकल्पग्रस्तांना रेल्वेस्थानकात व रेल्वेशी संबंधित विविध विकासकामांमध्ये प्राधान्य दिले गेल्यास त्यांना न्याय मिळेल, अशी भावना आहे.

धुतूम महसूली हद्दीत असणाऱ्या रेल्वेस्थानकात व रेल्वेशी संबंधित विविध विकासकामांत प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळावे रोजगार उपलब्ध व्हावा, प्राधान्य मिळावे या अनुषंगाने शेमटीखार शेतकरी श्रमिक कल्याणकारी सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी सदस्य रांजणपाडा रेल्वेस्थानकाजवळ बेमुदत उपोषण करणार आहेत.

या उपोषणाला सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा असून या मतदारसंघाचे आमदार महेश बालदी हेही प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत.



**उरण : केंद्रीय मंत्री कपिल पाटील उरण नगरीत आले असता त्यांचे राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष परिक्षीत ठाकूर, जिल्हा सरचिटणीस किशोर ठाकूर, तालुका युवक अध्यक्ष समत भोंगळे, प्रीतम ठाकूर आदींनी स्वागत केले.**



**पनवेल : माजी नगरसेविका निता माळी यांची लायन ग्रुप सामाजिक संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे अतुल पाटील, तालुका पोलीस ठाण्याचे शेलकर, गायकर, जितेंद्र फडके, रवी शेळके, अनिता डांगरकर, चंद्रकांत मंजुळे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

## व्हिस्टा कंपनीतर्फे जिल्हा ग्रामीण रुग्णालयाला तीन संगणक संच भेट



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीमधील व्हिस्टा फूड्स या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीकडून जिल्हा ग्रामीण रुग्णालयाला देणगी दाखल तीन कम्प्युटर संच सुपुर्द करण्यात आले असून लगेच कार्यान्वितसुद्धा करण्यात आले.

या वेळी शिवसेना पनवेलचे स्थानिक नेते व कंपनीचे व्यवस्थापन सल्लागार चंद्रशेखर सोमण, रुग्णालयातर्फे अधीक्षक डॉ. मधुकर पांचाळ, डॉ. सकपाळ डॉ. जठार, पटवर्धन हॉस्पिटलचे प्रशासकीय प्रमुख श्री. लघाटे तसेच कंपनीचे प्लांट हेड प्रवीण ठाकूर, एच. आर. डिपार्टमेंटच्या इंद्रायणी आगलावे, प्रथमेश पाटील, आय टी डिपार्टमेंटचे अजित मिश्रा, रुग्णालय कर्मचारी, शिवसेना महानगर प्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, उपमहा नगर प्रमुख महेश सावंत, शहर संघटक अभिजीत साखरे, विभागप्रमुख आशिष पनवेलकर, विभागप्रमुख अविनाश साफल्य, शाखाप्रमुख किरण पवार, यांच्यासह सर्व पदाधिकारी, रुग्णालयातील कर्मचारी, उपस्थित रुग्ण, पत्रकार बंधू उपस्थित होते.

ॲड. प्रथमेश सोमण यांनी प्रास्तविक करून चंद्रशेखर सोमण व ग्रामीण रुग्णालयाची धडपड अधोरेखित केली तसेच यापूर्वीही डिसेंबर २०१९ मध्ये व्हीस्टा कंपनीकडून रुपये पाच लाखांची औषधे ही एसआर फंडातून दिल्याचे विशेष करून नमूद केले.

## जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या कामोठे येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

जय गोपीनाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या कार्यालयाचे कामोठे येथे शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे व भाजप कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या वेळी भाजपाचे भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, माजी नगरसेविका पुष्पा कुत्तरवाडे, सहकार सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, रायगड जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, सुनील शिरसाट, काकासाहेब



कुत्तरवाडे, समाजसेवक किरण गीते आदी उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने काही नियुक्त्या करण्यात आल्या. रायगड जिल्हाध्यक्ष, किरण गित्ते, रायगड जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम केदार, संस्थेच्या उपाध्यक्षपदी विनोद खेडकर, महिला उपाध्यक्षा मनिषा वनवे यांच्या नियुक्ती वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आल्या. बबन मार्ग यांनी संस्थेच्या कामाचा आढावा मांडला व संस्थेच्या वतीने जी काही कामे केली त्याची विस्तृत माहिती सर्व मान्यवरांना दिली व या पुढील काळामध्ये वंचितांसाठी अनाथालय बांधण्याचा संकल्प संस्थेच्या वतीने सोडण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुभाष आंधळे, सचिव हनुमंत विघ्ने, खजिनदार संग्राम केंद्रे, उपाध्यक्ष अनंत ठोंबरे, पप्पू सोनवणे, विठ्ठल घोळवे, विनोद खेडकर आदींनी मेहनत घेतली.

## शांतिवनमध्ये रंगला गाण्यांचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीअल टाऊनच्या वतीने स्वरहारमोनी मुंबई यांच्या सौजन्याने रंगीत जुन्या नवीन गाण्यांचा बहारदार कार्यक्रम खास वृध्द लोकांना साठी शांतिवन कुष्ठ रोग निवारण समिती, करूणेश्वर वृद्धाश्रम, नेरे येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचा तेथील वृद्धांनी आनंद घेतला. स्वतःहून आवडीची गाणी सांगितली. काही हौशी वृद्धांनी नृत्य सादर केले. या वेळी सर्वांच्या चेहऱ्यावरील सुख आणि आनंद बघून आयोजकांना समाधान वाटले. या कार्यक्रमात माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी स्वरहारमोनी व इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीअल टाऊनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. वाद्य वृंद यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## स्वामी समर्थ मंदिरात सुलभ पारायण सप्ताह



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली शहर सेक्टर ४ येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मंदिरामध्ये रविवारी (दि. ८) सुलभ पारायण सप्ताह सोहळ्याची सांगता हजारो भाविक च्या उपस्थितीत झाली. या वेळी हजारो भक्तांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

मंदिर कमिटीच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले होते. या वेळी अनेकांनी अन्नदात्यानी सढळ हाताने मदत केली. या पारायण सप्ताह सोहळ्याला सुनील मुरलीधर खाडे, गायकवाड, राम सांगळे, विकास पाटील, मधुकर जाठोड, पांढरे, विलास गर्जे, विशाल बोबडे, सोमनाथ वावरे, बबन जाधव, माऊली सागडे आदी सेवेकरी व कळंबोली येथील सर्व स्वामी भक्त कार्यक्रमाला उपस्थित होते. दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.



**पनवेल : करण दिलीप घरत यांच्या घरातील गौरा गणपतीचे माजी नगरसेविका दर्शना भोईर, निता घरत आदींनी दर्शन घेतले.**

## संपादकीय

# आरोग्यम् धनसंपदा

मानवी जीवनात आरोग्याचे महत्त्व किती आहे हे कोरोना महामारीने संपूर्ण जगाला दाखवून दिले. तेव्हापासून आरोग्याविषयी सजगता वाढली आहे. शरीर सुदृढ व निरोगी राहण्यासाठी व्यायाम, योग्य आहारपद्धती व तत्सम बाबी आवश्यक आहेत. शिवाय शरीराची नियमित तपासणी करणेही गरजेचे असते. ही संधी पनवेलमध्ये दरवर्षी विनाशुल्क उपलब्ध करून दिली जाते. यंदाही या आरोग्य महाशिबिराचा अनेकांनी लाभ घेतला.

**पनवेलच्या खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ, भारतीय जनता पक्ष आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी विनामूल्य आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार वाटप महाशिबिर झाले. नागरिकांच्या सेवेसाठी यंदाचे हे १५वे महाआरोग्य शिबिर होते. या महाशिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण जगावर आरोग्याच्या दृष्टीने महासंकट आले होते. अमेरिका, इंग्लंड यांच्यासारखे अनेक बलाढ्य देश त्या वेळी हतबल झाल्याचे पहायला मिळाले, परंतु एवढी मोठी लोकसंख्या असलेल्या भारताने या संकटाचा धैर्याने मुकाबला केला तो देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वामुळे. त्यांच्याच पाठबळामुळे आपल्या देशात कोरोनावरील लसीची निर्मिती झाली. या लसीचा केवळ आपल्याच देशवासीयांनाच नव्हे; तर जगातील इतर देशांच्या नागरिकांनाही फायदा झाला. त्याबद्दल त्या देशांनी भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभारदेखील मानले. आपले पंतप्रधान आरोग्य क्षेत्राविषयी सजग आहेत. आरोग्यविषयक विविध योजना ते राबवित असतात, जेणेकरून त्यांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना घेता येईल. जनसेवेचा हाच आदर्श घेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप आमदार प्रशांत ठाकूर कार्यरत आहेत. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाच्या वतीने विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असतात. त्यापैकी एक आहे आरोग्य महाशिबिर. हा उपक्रम विनामूल्य असतो. या वेळी औषधोपचारही मोफत केले जातात. यंदाच्या महाशिबिरास उद्घाटक म्हणून केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील लाभले. अध्यक्षस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर होते, तर आमदार गणेश नाईक यांची सन्माननीय उपस्थिती होती. या वेळी केंद्रीय मंत्री कपिल पाटील आणि आणि आमदार व माजी मंत्री गणेश नाईक यांनी या स्तुत्य आरोग्यदायी उपक्रमाबद्दल ठाकूर पिता-पुत्रांचे कौतुक केले. खरोखरच गोरगरीब जनतेसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. या महाशिबिरात सर्वसाधारण रोग, बालरोग, महिलांचे आजार, त्वचारोग, हृदयरोग, दंतरोग, हाडांचे रोग, ईसीजी, मधुमेह, नाक-कान-घसा, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, क्षयरोग, कॅन्सर अशा विविध व सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या तज्ज्ञांमार्फत करून सल्ला आणि औषधोपचार मोफत करण्यात आले. त्याचबरोबर डोळ्यांची तपासणी व चष्मेवाटप तसेच अपंगांना तीनचाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अवयवदानाचे फॉर्म भरण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली होती. महाशिबिराचा ११ हजार ३५२ नागरिकांनी लाभ घेतला आणि त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांना धन्यवाद दिले. असे उपक्रम इतरांनीही राबवून आदर्श घेतला पाहिजे.**

# कर्जत शहरात वाहतुकीवर नियंत्रण आवश्यक

**खबरबात**
**विजय मांडे**



कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले आणि फेरीवाले. या सर्वांच्या मुळे कर्जतच्या बाजारपेठेतच नव्हे तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही. दिवसेंदिवस शहरातील वाहतुक कोंडी वाढती ठरत आहे. या वाहतूक कोंडीवर नियंत्रण असावे अशी सर्वांचीच अपेक्षा आहे, मात्र काही कारणानिमित्त अधिकारी वर्ग एकत्र आला की, शहरातील वाहरूक कोंडी सोडविण्याच्या नुसत्याच गप्पा होत असतात.

कर्जत ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्यावेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण हे रस्ते त्यावेळीदेखील म्हणजे ३५ - ४० वर्षांपूर्वी हातगाडीवाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगरपरिषद जाहीर झाली. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. त्यानंतर १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले.

सुरेश लाड यांनी शहरातील रस्ते काँक्रीट करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला व शहरातील रस्ते रुंद करण्यासाठी स्वतः लक्ष घातले. त्यावेळीही व्यापारी वर्गाने नाराजी दाखविली होती. त्यांना समजावून तर काहींचा विरोध पत्करून त्यांनी दोन्ही बाजारपेठा व शहरातील काही रस्त्यांचे रुंदीकरण घडवून आणले. रस्ते मोठे झाले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरी वाल्यांनी ठाण मांडले. खरे तर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई करण्यास कुणी धजावत नाही. एखाद्याने विरोध केला की, तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी 'जैसे थे' परिस्थिती होते.

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्यावेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन-तीन नगरसेवक आत्तासुद्धा नगर परिषदेत आहेत, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते, मात्र मतांच्या राजकारणासाठी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला आणि ही कारवाई 'औटघटकेची' ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे.



फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात, मात्र ज्यावेळी आरटीओंचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग वॅन उपलब्ध होती मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. नगर परिषद आणि पोलीस यंत्रणा ही जबाबदारी एकमेकांवर ढकलत आहेत. जिल्ह्यात अन्य ठिकाणी टोविंग वॅन सुरू आहेत. त्या पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत आहेत. त्यामुळेच त्या व्यवस्थित चालू आहेत. त्यामुळे कर्जतमध्येही पोलीस यंत्रणेने ही जबाबदारी घेतल्यास कोणतीही अडचण येणार नाही.

हातगाडी व फेरीवाले यांच्यासाठी एक वेगळेच ठिकाण ठरवून त्यांची व्यवस्था करायला हवी. कोरोनाच्या काळात या सर्वांना पोलीस मैदानात व्यवस्था करून दिली होती. त्यावेळी सर्वांना सोयीस्कर झाले होते. त्यावेळी दिवसाही बाजारातील रस्ता खूप मोठा आहे. हे पहायला मिळत होता. दुसरा उपाय म्हणजे चारचाकी गाड्या बाजारपेठेत येऊ न देणे. ठरवलेले एक दिशा मार्ग अंमलात आणणे. नगर परिषदेची जुनी इमारत पडून त्याजागी दोन तीन मजली पार्किंगची व्यवस्था केली तर बऱ्याच अंशी समस्या मार्गी लागतील. हातगाड्या व फेरीवाल्यांना शिस्त लावायची असेल तर त्या त्या संघटनांच्या पदाधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्या बैठका लावणे आवश्यक आहे. तरच शहरातील वाहतुकीची समस्या सुटू शकेल.

१ ऑक्टोबरला राष्ट्रीय स्वच्छता अभियानाच्या निमित्ताने तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी वैभव गारवे यांची एकत्रित भेट झाली. त्यावेळी वाहतूक समस्या व टोविंग वॅनचा विषय त्यांच्याकडे काढला. त्यावेळी चर्चा झाली, मात्र ठोस जबाबदारी कुणीच घेतली नाही. त्याचे कारणही तसेच होते. गेल्या वेळी टोविंग वॅन चा आलेला अनुभव फारसा चांगला नव्हता. त्यामुळे कर्जत शहरातील वाहतूक समस्येवर उपाय योजना करणे. या गप्पाच ठरणार की काय? असे वाटू लागले आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# देशात ५जी कनेक्टिव्हिटी मिळण्यापूर्वीच येईल ६जी




भारतात ५जीतंत्रज्ञान आले आहे, अनेक शहरांमध्ये गळे आणि Airtelची ५जीसेवा सुरू झाली आहे. देशातील लोकही हळुहळू ५जी कडे वळत आहेत. आता लवकरच देशात ६जी सुरू होऊ शकते. भारत सरकारने हास स्पीड ६जी सेवा आणण्यासाठी तयारी सुरू केली आहे. ५जी तंत्रज्ञान लोकप्रिय होण्यापूर्वीच देशात ६जी सुरू हो शकते.

रिलायन्स जिओ आणि एअरटेलने देशात ५जी कनेक्शन देणे सुरू केले आहे. देशातील अनेक शहरांमध्ये लोकांना ५जी कनेक्टिव्हिटी मिळू लागली आहे. परंतू, आता भारताने ६जी आणण्याची तयारी सुरू केली आहे. सुपर हाय स्पीड वायरलेस ब्रॉडबँड तंत्रज्ञान भारतात येईल. भारतात व्यावसायिक वापरासाठी हे जवळजवळ तयार आहे, परंतु संपूर्ण देशभरात पोहचण्यास थोडा वेळ लागेल. २०३० पर्यंत लोकांसाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

६जी ची खासियत म्हणजे, हे वेगवान ब्रॉडबँड स्पीड देईल. याचे नेटवर्क आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे चालवले जाईल. यामुळे लोकांना त्यांच्या गरजेनुसार वेग आणि नेटवर्क मिळेल. ५जी तंत्रज्ञानापेक्षा १०० पट अधिक गती देणारे हे नेटवर्क असेल. यावर तुम्ही अनेक चित्रपट काही सेकंदात डाउनलोड करू शकाल.

**६जी मध्ये काय मिळणार?**

तुम्हाला ५जी मध्ये १ Gbps चा स्पीड मिळत असेल, तर ६जी मध्ये १०० Gbps स्पीड मिळेल. बफरिंग टाइम ५जी मध्ये १ मिलीसेकंद असेल, तर ६जी मध्ये तो १ मायक्रो सेकंद असेल. ५जी सध्या स्मार्ट शहरे, स्मार्ट कारखाने, स्मार्ट फार्म आणि रोबोटिक्स क्षेत्रात कार्यक्षमता वाढविण्यात मदत करत आहे. ६जी तंत्रज्ञान याच्याही एक पाऊल पुढे असेल. हे सर्व प्रकारच्या स्पेक्ट्रम बँडला सपोर्ट करेल.

# आज जागतिक टपाल दिन

**निमित्त**




आज जागतिक टपाल दिन किंवा 'वर्ल्ड पोस्ट डे' हा जगभर साजरा केला जात आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनची ९ ऑक्टोबर १८७४ रोजी स्थापना झाली होती. १९६९ पासून ९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक टपाल दिन म्हणून साजरा केला जातो. पोस्टाच्या कामाची माहिती व्हावी, जनजागृती होवून पोस्टाचे महत्व वाढीस लागावे हा दिन साजरा करण्यामागील हेतू आहे. अनेक देशात यानिमित्ताने पोस्टल विक म्हणूनही पाळला जातो.

भारतामध्ये आधुनिक टपाल यंत्रणेची सुरुवात १ ऑक्टोबर १८५४ रोजी झाली. भारतात राजे-महाराजांनी संदेश पाठवण्यासाठी कबुतरांचा वापर केला. संस्थानांची स्वतःची अशी संदेश पोहोचवण्याची यंत्रणा होती. भारतामध्ये आधुनिक टपाल यंत्रणेची सुरुवात १ ऑक्टोबर १८५४ रोजी झाली. आज टपाल खाते टपाल सेवे व्यतिरिक्त बँकिंग, विमा, आर्थिक व्यवहारासाठीचे माध्यम झाले आहे.

भारतीय टपाल सेवा ही भारतातील मध्यवर्ती सरकारच्या टपाल खात्यामार्फत (डिपार्टमेंट ऑफ पोस्ट्स न्ड टेलिग्राफ्स) इंडिया पोस्ट या ब्रँडनावाने चालविली जाते. देशभर पसरलेल्या एक लाख ५५ हजार ३३३ टपाल कार्यालयामार्फत चालणारा इंडिया पोस्टचा कारभार हे जगातील या स्वरूपाचे सर्वात मोठे जाळे होय. देशाच्या दूरवरच्या आणि पोचायला अत्यंत अवघड भागातही पसरलेल्या या टपालसेवेच्या जाळ्यामार्फत अल्पबचत आणि इतर वित्तीय सेवाही चालविल्या जातात. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रही येथे मिळते. दरवर्षी ९ ऑक्टोबर रोजी जागतिक टपाल दिन साजरा केला जातो.

जगामध्ये पहिल्यांदा टपाल तिकीट सन १८४० मध्ये अस्तित्वात आले. तर भारतात तिकीट सन १८५२ मध्ये अस्तित्वात आले, ते टपालावर एम्बॉसिंग करून वापरले जायचे. ऑक्टोबर १८५४ पर्यंत अशा पद्धतीने तिकीट वापरले गेले, त्यानंतर प्रत्यक्ष कागदी तिकीट अस्तित्वात आले. या सेवेमध्ये आधुनिकता आली. एअर मेल सेवेला २१ फेब्रुवारी १९११ मध्ये सुरुवात झाली. त्यानंतर अनेक सुधारणा होत नाइट एअर मेल सेवा ३० जानेवारी १९४९मध्ये सुरू झाली.

मुंबईच्या जनरल पोस्ट ऑफिसची स्थापना सन १७९४ मध्ये झाली. मुंबई प्रांतासाठी इस्ट इंडिया कंपनीने हे कार्यालय स्थापन केले होते. फ्लोरा फाऊंटन येथील कार्यालयातून हे काम चालायचे. नवीन जीपीओ इमारत सन १९०४ ते सन १९१३ या काळात उभारण्यात आली. ही वारसा श्रीमंती आजही दररोज हजारो नागरिकांचे स्वागत करत दिमाखाने उभी आहे. देश स्तरावर टपाल खात्याच्या व्यापकतेचा आढावा घेतला तर १ लाख ५० हजाराहून अधिक पोस्ट ऑफिस देशभरात कार्यरत आहेत. यापैकी सुमारे १ लाख ३९ हजार पोस्ट ऑफिस ग्रामीण भागात आहेत. देश स्वतंत्र होताना २३ हजार ३४४ पोस्ट ऑफिस प्रामुख्याने शहरी भागांमध्ये होती. स्वातंत्र्यानंतर यामध्ये सुमारे सात पटीने वाढ झाली आहे. साधारणपणे एक पोस्ट ऑफिस २१.५६ चौरस किलोमीटर भागासाठी कार्यरत असते. यामध्ये ७ हजार ७५३ लोकसंख्येला सेवा दिली जाते असे सर्वसाधारण समीकरण असते.

पूर्ण देशामध्ये टपाल खात्याची विभागणी २३ भागांमध्ये करण्यात आली आहे. यात महाराष्ट्र सर्कलचा म्हणजे महाराष्ट्र विभागाचा विचार करताना यामध्ये महाराष्ट्र आणि गोवा या दोन्ही राज्यांचा समावेश होतो. महाराष्ट्रात पाच प्रभाग, ४० टपाल शाखा आहेत. तर गोव्यामध्ये १ प्रभाग आणि १ शाखा आहे. टपाल खात्याने महिलांना दिलेल्या समानसंधीचा विचार करता आज महाराष्ट्रात फक्त महिलांच्या माध्यमातून कार्यरत पाच कार्यालये असून मुंबईत टाऊन हॉल येथील कार्यालयाचा कारभार केवळ महिला चालवतात. हा बदल १२ एप्रिल २०१३ पासून अस्तित्वात आला. इंडियन पोस्ट पेमेंट बँकेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना घरी बसूनही बँकेच्या सुविधांचा फायदा घेता येतो.

**-संजीव वेलणकर**


**क्लिक...क्लिक...!**



**खारघर : ऑक्टोबर हीटचे चटके बसू लागल्याने दुपारच्या वेळेस रस्त्यावर नागरिकांची वर्दळ कमी झाली आहे.**

## आरोग्य प्रहर

# चवळी खाण्याने मधुमेह नियंत्रित होण्यास मदत



अलीकडच्या काळात, जगभरातील संशोधकांमध्ये चवळीला खूप लोकप्रियता मिळाली आहे कारण, चवळी मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरली आहे. २०१८ मध्ये जर्नल ऑफ फूड अँड ॲग्रिकल्चरमध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालामध्ये सूचित करण्यात आले की, आहारात चवळीचा समावेश केल्याने कॅलरीजचे प्रमाण कमी होते तसेच चवळी मधुमेह असलेल्या लोकांमध्ये ग्लुकोजचे नियमन करण्यास मदत करते.

**त्वचेची काळजी घेते**

चवळीमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि प्रोटिन्सचे प्रमाण भरपूर असते. व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ए अँटिऑक्सिडंट्स म्हणून आपल्या शरीरात काम करतात जे त्वचेचे आरोग्य सुधारतात. अँटिऑक्सिडंट्स वृद्धत्वाची लक्षणे रोखण्यास मदत करतात. चिडचिड कमी करतात, चेहऱ्यावरील डाग बरे करतात आणि सूर्याच्या अतिनील किरणांपासून आपल्या त्वचेचे संरक्षण करतात.

**पचनक्षमता सुधारते**

चवळीमध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते. जर तुम्हाला पचनाशी संबंधित समस्या, जसे की, गॅसेस, डायरिआ इत्यादी समस्यांचा सामना करावा लागत असेल तर तुम्ही आहारात चवळीचा समावेश करा. पोटाशी संबंधित अनेक समस्यांवर आपल्या आहारातील फायबर हा सर्वोत्तम उपचार आहे. तो शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करतो आणि आतड्यांची हालचाल वाढवण्यास मदत करतो.

**हृदयाचे आरोग्य सांभाळते**

चवळीमध्ये व्हिटॅमिन बी १ (थायमिन) चे प्रमाण भरपूर असते. ज्यामुळे, आपल्या हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. हे व्हिटॅमिन हृदयाच्या कोणत्याही समस्येपासून आपल्या शरीराचे संरक्षण करते. या व्यतिरिक्त चवळीमध्ये विविध प्रकारचे फ्लेवोनॉईड्स असतात, ज्यामुळे जळजळ कमी होते. आहारातील फायबर देखील शरीरातील कॉलेस्ट्रॉलचे प्रमाण संतुलित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका कमी होतो.

**-डॉ. प्रमोद ढेरे**

# मुरूड ग्रामीण रुग्णालयात कर्मचार्‍यांची गरज

### वैद्यकीय अधिकार्‍यांसह ११ पदे रिक्त



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडच्या ग्रामीण रुग्णालयात तीन वैद्यकीय अधिकार्‍यांसह ११ पदे रिक्त असल्याने याचा आरोग्य सेवेवर गंभीर परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे सध्या उपलब्ध कर्मचार्‍यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळे तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

मुरूडमध्ये नबाबकालिन असलेल्या या रुग्णालयात शहरासह तालुक्यातील दुर्गम भागातील रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येत असतात, मात्र वैद्यकीय अधिकारी व अपुर्‍या कर्मचार्‍यांमुळे त्यांना उपचारासाठी अडचणीचे होत आहे. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकार्‍यांसह ११ पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत अधिकारी-कर्मचार्‍यांवर कामाचा अतिरिक्त ताण येतो. ग्रामीण रुग्णालयातील तीन वैद्यकीय अधिकार्‍यांची पदे रिक्त झाली आहेत तर काही कर्मचार्‍यांचा अस्थायी सेवेचा कार्यकाळ डिसेंबर अखेर संपुष्टात येत असल्याने रुग्णालयातील एक अधिपरिचारिका, एक औषध निर्माण अधिकारी, चार कक्षसेवक, एक सफाई कामगार आणि दंत सहायक (वर्ग ४) अशी एकूण ११ पदे रिक्त झाली आहेत. कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे रुग्णसेवेत अनियमिता, तसेच आपत्तीजनक स्थिती ओढवल्यास निर्णय घेताना अडचणीचे होते.

हंगामी तत्त्वावर, तसेच कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येत असल्याने बाह्य रुग्णसेवेवरही याचा परिणाम होत आहे. ग्रामीण रुग्णालयात दररोज किमान १०० रुग्णांची तपासणी होते. याठिकाणी ३० खाटांची क्षमता आहे. शासनाच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष पुरवून वैद्यकीय अधिकार्‍यांसह रिक्त पदे तातडीने भरणे खूप आवश्यक आहे. ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय असतानासुद्धा पुरेसा स्टाफ नियुक्त न केल्याने येथे उपचार करण्यास दिरंगाई होत आहे.

नागरिकांना ५० किमी लांब असणार्‍या सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवावे लागत असल्याने ग्रामीण रुग्णालयाचा फारसा उपयोग होताना दिसत नाही. राज्य शासनाकडून रिक्त असणारी पदे तातडीने भरण्यात यावीत अशी मागणी समस्त नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## निवडक

### चौल येथे नेत्र तपासणी शिबिर



**रेवदंडा** : चौल चंपावती मंदिरात श्री सत्यसाई संघटना मुंबई मेट्रो प्रदेश महाराष्ट्र आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांचे विद्यमाने शुक्रवारी (दि. ६) मोफत नेत्र व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण १३० जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये २० जणांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी रूग्ण आढळले आहेत. १६००पेक्षा जास्त रूग्णाची डोळे तपासणी व ३०० पेक्षा जास्त रूग्णांचे मोतिबिंदू ऑपरेशन करण्यात आले, अशी माहिती श्री सत्यसाई संघटनेचे सुरेश मेहेर यांनी दिली. या शिबिरास श्री सत्यसाई संघटनेचे पदाधिकारी व सेवक यांचेसह चंपावती मित्रमंडळाचे जितेश नागवेकर, रविंद्र महाले, ऋग्वेद जोशी, जयवंत नागवेकर, सिद्धेश जाधव, मनोज नाईक, मधुकर सावंत, संदिप घरत यांनी विशेष परिश्रम घेतले.

### मास्क मेकिंग स्पर्धा उत्साहात



**पेण** : जनसामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जनजागृती, कौशल्य विकास उपक्रम आदींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून गुरुवारी (दि. ५) जिते येथे मास्क मेकिंग स्पर्धा घेण्यात आली, तसेच कापडी पिशव्या वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित असणार्‍या प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षिका शैला म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली. संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कौशल्य उपक्रम राबिवले जातात. कार्यक्रमासाठी संचालक डॉ. विजय कोकणे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका मंदाकिनी घरत, शैला म्हात्रे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### अग्रवाल विद्यामंदिरात रेखाकला परीक्षा

**नागोठणे** : महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनयामार्फत दरवर्षी घेण्यात येणार्‍या रेखाकला म्हणजेच एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेचे आयोजन नागोठणे येथील कोएसोचे श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर व एस. पी. जैन ज्युनिअर कॉलेजच्या केंद्रावर करण्यात आले होते. ही परीक्षा ४ ते ७ ऑक्टोबरदरम्यान ऑफलाईन पद्धतीने झाली. संपूर्ण नागोठणे विभागातील जवळपास १२ शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी वस्तू चित्र, स्मरणचित्र, संकल्पचित्र व कर्तव्य भूमिती आणि अक्षरलेखन यावर आधारित चित्र रेखाटन केले. या परीक्षेसाठी नागोठणे विभागातील विविध माध्यमांच्या शाळांमधील इ. सातवी ते बारावीपर्यंतचे एकूण ९४० विद्यार्थी बसले होते. परीक्षेचे केंद्र संचालक व गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य अनंत चिनके यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रमुख कला शिक्षक रविंद्र कोष्टी आणि सहकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्‍यांनी मेहनत घेतली.

## दांडफाटा येथे शिवशौर्य यात्रेत पुष्पवृष्टी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जय श्रीराम, भारत माता की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, या घोषणेने दांडफाटा परिसर दणाणून गेला. फटाक्यांची आतषबाजी व ढोल-ताशाच्या गजरात पुष्पवृष्टी करीत शिवशौर्य यात्रेचे रसायनी दांडफाटा येथे जोरदार स्वागत करण्यात आलेन

विश्व हिंदू परिषदेच्या षष्टीपूर्ती निमित्त बजरंग दल कोकण प्रांत यांच्या सहयोगाने शिवराज्याभिषेक ३५० व्या वर्षाचे औचित्य साधत या यात्रेचे सिंधुदुर्ग ते मुंबई, असे आयोजन करण्यात आले आहे. दांडफाटा येथे या यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी दांड वळणावर मोहोपाडाकडे जाणार्‍या रस्त्यावर फुलांनी व रांगोळीने रस्ता सजविण्यात आला होता. या यात्रैसोबत बजरंग दलाच्या नौजवानांकडे दुचाकी घेऊन सोबत होते.


या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे विश्व हिंदू परिषद व बजरंग दल रसायनी यांनी जनार्दन मालुसरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुष्पवृष्टी करीत अभिवादन केले. महिला व बालकल्याण माजी सभापती उमा मुंढे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप पाटील, सतीश महाडिक, डॉ. संजय कुरंगळे, सागर सुखदरे, चेतन जाधव, प्रशांत पाटील, वैजयंती ठाकूर, गणेश काळे तसेच विश्वहिदू परिषद व बजरंग दलाचे संजय उल्वेकर, रमेश मोगरे, साईनाथ श्रीख, रूपेश मेस्त्री, खेडेकर, प्रशांत तांबोळी, मलेश गुडसे, पॅडी कुरंगळे, राकेश खराडे आदी उपस्थित होते.

## डिझेल चोरी करणारे त्रिकूट जेरबंद

### चार लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**रोहा : रामप्रहर वृत्त**

कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील वरसगाव येथील पेट्रोलपंपानजीक पार्किंग केलेल्या ट्रकमधून डिझेल चोरी करीत असलेल्या तिघांना गस्तीवरील असलेल्या पोलिसांनी शुक्रवारी (दि. ६) रंगेहात पकडले.




वरसगाव येथील पेट्रोलपंपानजीक रस्त्याच्या कडेला काही ट्रक उभे करण्यात आले होते. या ट्रकमधून हे तिघे चोरटे डिझेल काढत होते. त्याच वेळी रात्रीच्या गस्तीवर असलेल्या पोलिसांनी या चोरट्यांना हटकले. पोलिसांना पाहून त्यापैकी दोघे बाजूच्या झाडीमध्ये पळाले, तर एक जण स्कॉर्पीओ गाडीसह पळून जात असताना त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी पळून गेलेल्या दोन चोरट्यांचा आजूबाजूचे झुडपांमध्ये शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. या चोरट्यांच्या स्कॉर्पीओ गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये प्रत्येकी ३५ लिटर क्षमतेचे एकूण आठ प्लास्टिकचे कॅन आढळले. राजेश भगवान पवार (रा. कोपरखैरणे नवी मुंबई), इशाक अष्फाक खान (रा. रोडपाली, नवी मुंबई), साजीद इस्लाम शेख (रा. वाशी, नवी मुंबई) अशी आरोपींची नावे आहेत. या आरोपींविरोधात या अगोदरदेखील अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. कोलाड पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्ह्यात एकूण चार लाख २१ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली हवालदार चेतन कुथे हे करीत आहेत. कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे व त्यांची टिम हजवालदार मंगेश पाटील, चालक पोलीस नाईक दत्ताराम महाडिक, श्रीराम मोरे, परेश मोरे तसेच ट्राफिक वार्डन एकनाथ भालेकर, अमर घाग, सचिन घाग यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

## माथेरान नगर परिषद क्षेत्रात स्वच्छता मोहीम

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

शहरामध्ये फक्त सुशोभिकरण नव्हे तर सातत्याने स्वच्छता असणे आवश्यक असून त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. ६) माथेरान नगरपालिकेने मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला.

या वेळी अहिल्याबाई होळकर चौक ते इंदिरा गांधीनगर आणि वे साईट हॉटेलपर्यंतचा रस्ता आणि रेल्वेट्रॅकचा कचरा उचलण्यात आला. यात रस्तात पडलेली झाडे गटारत पडलेल्या बाटल्या उचलून गटारे साफ करण्यात आली. एकूण एक टन कचरा सुमारे ५० कर्मचारी वर्गाच्या साहाय्याने उचलून शहर स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता अभियानात नगर परिषदेचे अधिकारी स्वछता निरीक्षक नरेंद्र सावंत, वरिष्ठ लिपिक प्रविण सुर्वे, कर विभाग प्रमुख सदानंद इंगळे, अजय साळुंखे, जयवंत वर्तक, अमित भस्मा, ज्ञानेश्वर सदगीर यांच्यासह कामगार उपस्थित होते.



### महेश सावंत यांची नियुक्ती



**पनवेल :** उद्योजक तसेच युवा नेतृत्व महेश सावंत यांची शिवसेना उपमहानगरप्रमुख पनवेल व नवीन पनवेल या विभागासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचे नियुक्तीपत्र जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. कळंबोली येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या आजच्या कार्यक्रमात जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी युवा नेतृत्व महेश सावंत यांची नियुक्ती उपमहानगरप्रमुखपदी केली.

या वेळी महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण व तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## कर्जत शहरात जंतूनाशक फवारणी करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेने लवकरात लवकर जंतूनाशक फवारणी करावी, अशी मागणी करीत वंचित बहुजन आघाडीचे कर्जत नगर परिषदेला निवेदन दिले आहे.

कर्जत शहरात गेल्या महिनाभरापासून डेंग्युचे रुग्ण वाढत आहेत. याबाबत नगर परिषद प्रशासनातर्फे तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यामुळे कर्जत नगर परिषदेने त्वरीत जंतूनाशक फवारणी करावी, अशा मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे वतीने मुख्याधिकारी यांना देणेत आले.

निवेदन देताना सम्यकचे महाराष्ट्र उपाध्यक्ष ॲड. कैलास मोरे, वंचित तालुकाध्यक्ष धर्मेंद्र मोरे, जिल्हा सचिव अनिल गवळे, तालुका उपाध्यक्ष विद्यानंद ओव्हाळ, महासचिव प्रदीप ढोले, सचिव प्रदीप गायकवाड, सम्यकचे प्रविण सोनावणे, कमलाकर जाधव, नामदेव जाधव, दिपक जाधव, निलेश पवार प्रज्वल जाधव, सुदर्शन गायकवाड, अनिकेत गायकवाड, संदिप ढोले, अशोक ढोले आदी उपस्थित होते.

## ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयात मूट कोट स्पर्धा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयामध्ये मूट कोर्ट स्पर्धेचे शनिवारी (दि. ७) आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रा. डॉ. संदीप घाडगे यांनी स्पर्धेच्या आयोजन आणि त्यामागील उद्देश सांगून प्रास्ताविक केले. स्पर्धेमध्ये विधी महाविद्यालयातील पाच आणि तीन वर्षे अभ्यासक्रमाच्या ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना न्यायालयामध्ये कामकाज कसे चालते तसेच न्यायालयात कसे वागावे हे अनुभवण्याकरिता अभिरुप न्यायालय उपक्रम फायदेशीर ठरतो. या स्पर्धेकरिता भारतीय दंड संहितेमधील कलम ३६१ आणि ३६६ अंतर्गत एक केस देण्यात आली होती. या केसमध्ये सेशन न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरुद्ध क्रिमीनल प्रोसिजर कोडचे कलम ३७४(२)अंतर्गत अपिल करायचे होते.

या स्पर्धेच्यानिमित्त सेशन न्यायालय आणि उच्च न्यायालय यांचे कामकाज कसे चालते यासंदर्भात माहिती देण्यात आली. या स्पर्धेमध्ये मैथिली भगत आणि अभिजित पाटील यांच्या संघाने प्रथम, आदित्य गावंड आणि चैतन्य पाटील यांच्या संघाने द्वितीय, आकांक्षा खैरकर आणि दिग्विजय कार्वेकर यांच्या संघाने तृतीय तर चैत्रवी माईनकर आणि नेहा पोकल यांच्या संघाने उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला, तसेच आदित्य गावंड या विद्यार्थ्याची उत्तम मूटर म्हणून निवड करण्यात आली. आदित्य गावंड आणि चैतन्य पाटील यांना उत्तम मेमोरियल म्हणून निवडण्यात आले. प्रा. मनोज धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या तयारीकरिता उत्तम मार्गदर्शन केले.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रा. नीलम हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रा. मनोज धुमाळ, प्रा. निलम म्हात्रे, प्रा. चिन्मय राणे, प्रा. पियुषा पाटील, शिक्षकेतर कर्मचारी निखिल माळी तसेच विद्यार्थी अनिकेत मोरे यांनी कार्यक्रमाची यशस्वीपणे तयारी केली.



## सायबर सुरक्षेसाठी ‘लायन्स’तर्फे खोपोलीत जनजागृतीपर व्याख्यान

**खोपोली : प्रतिनिधी**

वाढत्या इंटरनेटच्या वापरामुळे लोकांचे आयुष्य अधिक सहज आणि सोपे झाले आहे, मात्र दिवसेंदिवस वाढता इंटरनेटचा वापर आणि त्या अनुषंगाने सायबर गुन्ह्यांत होणारी वाढ ही चिंताजनक आहे. या सायबर क्राईमविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या अनुषंगाने लायन्स क्लब खोपोलीच्या वतीने शनिवारी (दि. ७) लायन्स सभागृहात सायबर सुरक्षा व्याख्यान आयोजित केले होते.




(छाया : जयवंत माडपे)

या वेळी खोपोली सहाय्यक पोलीस निरिक्षक हरेश काळसेकर तसेच एमकेसीएलचे विश्वास माटे यांनी उदारणासह सायबर क्राईमविषयी माहिती देत मार्गदर्शन केले.

लायन्स क्लबचा ऑक्टोबर सर्व्हिस विकनिमित्ताने महिनाभर विविध उपक्रम अध्यक्ष अतिक खोत यांच्या संकल्पनेतून राबविल्यानंतर सुरक्षित व सतर्क समाज घडवण्यासाठी सायबर सुरक्षा यासंबंधीची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी व्याख्यान आयोजित केले होते.

या वेळी शिळफाटा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष राजू अभाणी, लायन्सचे अध्यक्ष अतिक खोत, अपघातग्रस्त टिमचे गुरूनाथ साठेलकर, सुभाष पोरवाल, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ रायगड मार्केटिंग प्रमुख विश्वास मते, दीपेंद्रसिंह भदोरीया, दिलीप पोरवाल, शैली मेहता, चेतना केजरीवाल उपस्थित होते. अध्यक्ष अतिक खोत बोलताना म्हणाले की, सायबर तंत्रज्ञान प्रशिक्षण व सतर्कता जनजागृती करून बौद्धिक विकास व समाज सशक्तिकरणाचे उद्देश असल्याचे सांगितले.

सायबर गुन्हे घडताना सोशल मिडीया, फेसबुक, इस्टाग्राम, टेलिग्राम सारख्यांवर आपली खरी माहिती देत असतो. यामुळे गुन्हे घडत आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून होणारी फसवणूक टाळण्यासाठी इंटरनेट वापरताना जागृत रहा. आपणाला फेक कॉल आले तर पोलिसांशी संपर्क करा, तरच सायबर गुन्हे आटोक्यात येतील, असे मार्गदर्शन सहाय्यक पोलीस निरिक्षक हारेश काळसेकर यांनी केले.

### विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा गौरव

या वेळी गणेशोत्सवामध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेत्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्य पदकाची मानकरी क्षितिजा मरागजे व एशियन पावर लिफ्टिंग फेडरेशन ७४ गटात द्वितीय पारितोषिक मिळविल्याबद्दल अक्षय क्षणमोघन यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

# आरोग्य महाशिबिर




भारतीय जनता पार्टी, पनवेल व रायगड मेडिकल अ
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विक
आगि
भारतीय जनता पार्टी, पनवेल व रायगड
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित


आगि
भारतीय जनता पार्टी, पनवेल व रायगड मेडिकल असोसिएशन
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

मा.श्री. गणेशजी नाईक

मा.श्री.रामशेठ
माजी खासदार

















## निवडक

### नढाळ आदिवासीवाडीत वन्यजीव सप्ताह



**चौक** : विभागातील नढाळ ठाकूरवाडी येथील संयुक्त वन व्यवस्थापन समिती व वनविभाग यांच्या माध्यमातून वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. या वेळी आदिवासी बांधवांना वन्यजीव व वनराई, वृक्ष लागवडीबाबत माहिती देण्यात आली. वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सचिव, सभासद, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. उपवनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, सहाय्यक वनसंरक्षक पनवेल संजय वामोडे, वनक्षेत्रपाल कर्जत (प.) समीर खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम करण्यात आला. वन्यजीव संरक्षण आणि प्राण्यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमास वनपाल जयवंत सुपे वनरक्षक, वनरक्षक स्टाफ वर्षा केदारी, संदिप रकटे, रमेश झोरे, दीपक पाटील, संतोष मुंडे व संजय वाघे वनमजूर हे उपस्थित होते.

### जितेंद्र पाटील यांना 'जीवनगौरव'

**माणगाव** : माणगावचे माजी औषध निर्माण अधिकारी



जितेंद्र पाटील यांचा शुक्रवारी (दि. ६) औषध निर्माण अधिकारी संघटनेच्या वतीने जीवनगौरव पुरस्काराने अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. जितेंद्र पाटील यांनी माणगाव, तळा, दासगाव, महाड, पोयनाड आदी ठिकाणी आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी म्हणून काम केले आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात जितेंद्र पाटील हे नेहमीच कार्यरत असतात. त्यांना मिळालेल्या जीवनगौरव पुरस्कारामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### सापांना वाचविण्यासाठी सर्पमित्रांना भेट

**सुधागड** : सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी त्यांची मुलगी स्नेहल हिच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील सर्पमित्रांनी सर्प पकडण्याकरीता यु आकारातील काठी भेट दिली आहे. हा कार्यक्रम पाली वनविभागाच्या कार्यालयात नुकताच झाला. या भेटीमुळे तालुक्यातील सर्पमित्रांना सापाचा जीव वाचविणे सोपे जाणार आहे. सुरक्षितरित्या साप पकडून तो नैसर्गिक अधिवासात सोडता येईल. या विधायक उपक्रमाचे वनविभाग व सर्पमित्रांनी कौतुक केले. या वेळी वनपाल वसंत जाधव, वनरक्षक मारुती मुंडे, योगेश साजेकर, योगिता पुंडे, मनीषा मोरे, पांडुरंग पवार आदी वनविभागाचे कर्मचारी, दत्तात्रेय सावंत, स्नेहल सवांत आणि तालुक्यातील सर्पमित्र उपस्थित होते.

# सर्वांना अभिप्रेत खासदार रायगडात निवडून आणू

## भाजपच्या रोह्यातील बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा निर्धार

**धाटाव : प्रतिनिधी**

दक्षिण रायगड भाजपचे संघटनात्मक बैठकांचा धडाका संपूर्ण रायगड जिल्ह्यात सुरू आहे. संपूर्ण जिल्ह्यात पक्षाला अनुकूल वातावरण निर्माण झालेले आहे. प्रत्येक ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळत आहे. दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ७) रोह्याजील शासकीय विश्रामगृहत जिल्हा कमिटी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व नागरिकांना रायगड जिल्ह्यात अभिप्रेत असा भाजपच्या विचारांचा खासदार निवडून आणू असा निर्धार



सर्वांनी केला.

दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी सांगितले की, अमित घाग यांनी गेले पाच-सहा वर्षांत संघटनात्मक काम केले होते, त्यामुळेच आज रायगड जिल्हा भाजपच्या कमिटीने त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड केली. त्यांना मनापासून शुभेच्छा. विशेषतः बुथ कमिटी, शक्ती केंद्रप्रमुख व संघटनात्मक बांधणी मजबूत केली पाहिजे, तसेच सरल अ‍ॅप डाऊनलोड करून मोदीजींच्या योजना घराघरापर्यंत पोहचविण्याचे आवाहन धैर्यशील पाटील यांनी केले.

आगामी २०२४ महाविजयाच्या तयारीनिमित्त प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ११ तारखेला रायगड जिल्ह्यात येत आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात संघटनात्मक बैठका घेण्यात आल्या, तसेच येऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये पूर्ण ताकदीने उतरून जिल्ह्यात भाजप क्रमांक एकचा पक्ष असेल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी व्यक्त केला.


या वेळी सरचिटणीस प्रशांत शिंदे, बिपिन म्हणूनकर, मिलिंद पाटील, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, श्रेया कुंटे, सोपान जांभेकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रईस कादरी, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष निमिश वाघमारे, प्रदेश सचिव अल्पसंख्याक बबलू सय्यद, दक्षिण भारतीय पी. व्ही. सनन कुमार, कामगार नेते विवेक अभ्यंकर, नाना महाले, ज्येष्ठ नेते आप्पा देशमुख, विष्णू मोरे, मारुती देवरे, रोशन चाफेकर श्रद्धा घाग, विलास डाके, महेश ठाकूर, कृष्णा बामणे, अविनाश कान्हेकर, शिवाजी जाधव, राजेश डाके, मोरेश्वर ठाकरे, एकनाथ ठाकूर, अरुण वाघमारे, अनंत लाड, प्रियंका पिंपळे, रिया कासार यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पौंध व माजगाव आदिवासी बांधव स्मशानभूमीच्या प्रतीक्षेत

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीत असलेल्या पौंध आणि माजगाव अशा दोन आदिवासीवाडीतील ग्रामस्थांना स्मशानभूमी नसल्यामुळे पौंध येथील असलेल्या पाताळगंगेच्या किनाऱ्यावर अंतिम संस्कार करण्याची वेळ आली आहे. गेली अनेक वर्षे या आदिवासी बांधवांना स्मशानभूमी नाही ही मोठी शोकांतिका आहे. आता तरी शासनाने या आदिवासी बांधवांच्या मागणीकडे गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

पाताळगंगेच्या किनाऱ्यावर



एका दगडावर लाकडे रचून विधी केली जाते. शिवाय स्मशानभूमी नाही तर निवाराशेड कोठून येणार प्रत्येक वेळी ही वस्तूस्थिती आहे. गेल्या अनेक पिढ्या उघड्यावर अंतिम संस्कार करीत आहे. त्यामुळे आता तरी स्मशानभूमी उभारण्याची मागणी होत आहे.

**पौंध आणि माजगाव येथील आदिवासी बांधवांना स्मशानभूमीसाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आमदार निधीतून स्मशानभूमी बांधावी यासाठी पाच ते सहा महिन्यांपूर्वी प्रस्ताव पाठविला आहे. सध्या निवडणुकीची रणधुमाळी असल्यामुळे निवडणूक झाल्यानंतर तातडीने त्यांचा प्रश्न मार्गी लावला जाईल.**

**-संदिप धारणे,**
**ग्रामसेवक, माजगाव**

## खोटे सोने तारण ठेवून बँकेची फसवणूक

### आठ जणांविरोधात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

सोने तारणवर कर्ज घेताना बनावट सोने देऊन बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी रितेश संतोष शेलार (रा. गोठीवली डोणवत, खालापूर), सुरेश शरद पवार (मु. निंबोडे खालापूर), गुरुनाथ भगवान ठोंबरे, हरिदास संभाजी ठोंबरे, किशोर लहू ठोंबरे (तिघे रा. कलोते खालापूर), भैरूलाल शंकरलाल प्रजापती (सोमजवाडी, खोपोली), तुकाराम दत्तात्रय पंडित (रा.माउंटन सोसायटी खोपोली) आणि योगेश सुर्वे यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.




वरील सर्व आरोपींनी खोपोलीतील तामिळनाडू मर्कटाएल बँकेत सोने तारणवर कर्ज घेताना कट रचून हॉलमार्कच्या शुध्दतेचे बनावट मोहर उमटविलेले २,७६०.७ ग्रॅम वजनाचे बनावट सोने खरे असल्याचे भासवून त्यावर कर्ज मंजूर करून घेतले.

बँकेचे मूल्यवर्धक तुकाराम पंडित यांनी त्यांचे सहीचे फॉर्मचे बनावटीकरण करून ते बनावट सोने बँकेत तारण ठेवून त्या बदल्यात एक कोटी नऊ हजार इतकी रक्कम प्राप्त करून बँकेची फसवणूक केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात बँकेचे व्यवस्थापक संतोष चंद्रमोहन यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी भादंवि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७२, १२० ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस सहाय्यक निरीक्षक अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.

## रोहा सिटीझन फोरम, प्रेस क्लबतर्फे सुबोध गांगुर्डेचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

शिवरायांनी निर्माण केलेल्या रयतेच्या स्वतंत्र सार्वभौम स्वराज्याचे रक्षण दऱ्याखोऱ्यातील गडकोट किल्ल्यांनी केले. शिवरायांच्या स्फूर्तीदायी इतिहासाची साक्ष देणारे शेकडो गडकिल्ले संपूर्ण महाराष्ट्रभर विखुरलेले आहेत. त्यापैकी ३७० किल्ल्यांवरील माती गोळा करण्याचा संकल्प केलेल्या सुबोधने गेल्या २९० दिवसांत ३६१ गडकिल्ले पादाक्रांत करून सुबोध नुकताच आपल्या गावात रोह्यात आला.

रोहा सिटिझन फोरम आणि रोहा प्रेस क्लबने गुरुवारी शासकीय विश्रामगृहात सुबोधच्या गडकोटांवरील सुरू असलेल्या मोहिमेसंदर्भात सेशन आयोजित केले होते. या वेळी सुबोध गांगुर्डे यांनी रोह्यातील सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांसोबत संवाद साधला. सुबोधशी संवाद



साधण्यासाठी आणि सुबोधला प्रोत्साहित करण्यासाठी शिवप्रेमींनी गर्दी केली होती.

माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी साधारणपणे ५० लक्ष रुपये खर्च असून रोहेकरांनी या खर्चातील जास्तीत जास्त भार उचलावा, असे आवाहन करण्यात आले.

ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. सुनील सानप यांच्या शुभ हस्ते सुबोधला सन्मानित करण्यात आले. या वेळी सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक आप्पा देशमुख, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, सामाजिक कार्यकर्ते मकरंद बारटके, ज्येष्ठ गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय नारकर, प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुहास खरीवले, माजी अध्यक्ष नरेश कुशवाह आदी उपस्थित होते.

### ▮ सर्वांच्या आशीर्वादाने अवघड मार्ग सुकर

*सह्याद्री आणि घाटवाटांमधील हा प्रवास वाटतो तितका सोपा नव्हता. त्यात एकट्याने प्रवास करायचा म्हटल्यावर अनेक आव्हाने सामोर आली. या वाटेत पट्टेदारी वाघ, रानगवे, अस्वल, बिबट्याचादेखील अनुभव आला, तर कधी जंगलात वाट हरवली. या प्रवासात गडकिल्ल्यांचा भौगोलिक अभ्यास महत्त्वाचा ठरला, मात्र या एकंदरीत प्रवासात महाराजांचे आशीर्वाद आणि महाराष्ट्रातील असंख्य दुर्गप्रेमी शिवप्रेमींच्या सदिच्छांमुळे हा अवघड वाटणारा प्रवासातून माझा मार्ग सुकर झाला, असे दुर्गारोहक सुबोध गांगुर्डे याने सांगितले.*

## सर्वेक्षण समितीची कर्जत एसटी आगराला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत सर्वेक्षण समितीने रविवारी (दि. ८) अचानक कर्जत एसटी आगाराला भेट दिली व दोन तास सर्व परिसराची पाहणी केली, तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगारच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून अधिक चांगले आगार होण्यासाठी महत्त्वाच्या सूचना केल्या.

रत्नागिरी जिल्ह्याचे विभाग नियंत्रक प्राज्ञेश बोरसे यांच्या अध्यक्षतेखालील सर्वेक्षण समिती कर्जत एसटी आगारामध्ये आली. कामगार अधिकारी विलास चौगुले, विभागीय सांख्यिकी अधिकारी राकेश पोवार, उपयंत्र अभियंता मृदुला जाधव, विजय मांडे यांचा या समितीमध्ये समावेश होता. आगार व्यवस्थापक मानसी शेळके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर वाहन नियंत्रक दीपक देशमुख, सहाय्यक वाहन नियंत्रक महादेव पालवे, वरिष्ठ लिपिक अनुजा सुरावकर यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली.

या वेळी त्यांनी स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय दिला तसेच संपूर्ण आगार परिसरातील स्वच्छता, प्रवासी निवारा, कार्यालयातील कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

आगार व्यवस्थापकांचे निवासस्थान, उद्घोषणा तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे, याबाबत गौरवोद्गार काढले. या तालुक्यात माथेरान सारखे जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण आहे. तेथेही आपली एसटी पोहचली आहे. आता नवीन येणाऱ्या बसची सजावट माथेरान पर्यटन स्थळाला अनुसरून केल्यास प्रवासी अधिक आकर्षित होतील, असेही समिती अध्यक्ष प्राज्ञेश बोरसे यांनी सांगितले.



## माळराने, शेतात भिरभिरत्या फुलपाखरे, चतुरांचे आगमन


**माणगाव : प्रतिनिधी**


परतीचा पाऊस सुरू झाला आहे. सकाळ, संध्याकाळी पावसाळी वातावरण व दिवसभर तळपणाऱ्या उन्हामुळे माळराने, शेतशिवारात चतुर, फुलपाखरांचे आगमन झाले असून माळरानात चतुर व फुलपाखरांची भिरभिर सुरू झाली आहे.

पावसाळ्यात भातशेती तयार झालेल्या हंगामात चतुरांचे, फुलपाखरांचे आगमन होत आहे. छोट्या आकाराचे, सर्वत्र भिरभिरणारे चतुर, फुलपाखरे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. तालुक्यात खरीप हंगाम सुरू असून अनेक लहान-मोठे चतुर, फुलपाखरे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. या चतुर, फुलपाखरांमध्ये विविध रंग, आकार व प्रकर दिसत आहेत. अंगावर ठिपके असणारे फुलपाखरू, नक्षीदार ,जाळीदार चतुर पर्यावरण प्रेमी, निसर्गप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहेत.

जगभरात चतुरांच्या पाच हजार







पाचशे जाती आढळतात. जवळपास पाचशे जाती भारतात आढळतात. चटकचांदणी नावानेही ते ओळखले जातात. त्यांच्या दोन्ही डोळ्यात मिळून ३०,००० नेत्रिका असतात. हवेतल्या हवेत भक्ष पकडणारा चतुर एकमेव कीटक आहे.

फुलपाखरांच्या वाढीच्या अंडी, अळी व कोष अशा अवस्था असतात. विशिष्ट जातीची फुलपाखरे विशिष्ट झाडावर अंडी घालतात. पानांशी मिळताजुळता त्यांचा रंग असतो. आकर्षक रंग असलेली कीटक फुलपाखरे मिशांनी वास घेतात, पायाने चव ओळखतात. त्यांचे आयुष्य १४ दिवसांचे असते. भारतात १५०० पेक्षा अधिक प्रजाती आढळतात.

**भरपूर खाद्य व योग्य वातावरण असल्याने या हंगामात मोठ्या प्रमाणावर फुलपाखरे, चतुर दिसून येत आहेत. माळरानावर हे दृश्य पाहणे अत्यंत मनवेधक आहे. यावर अधिक अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.**

**-राम मुंढे, पशुपक्षी निरीक्षक,**
**पर्यावरप्रेमी**

**फुलपाखरे, चतुर अन्नासाठी या भागात दिसून येतात. या हंगामात माळरानावर मोठी संख्या दिसून येते. भातकापणीच्या हंगामामध्ये दरवर्षी यांची मोठी संख्या दिसून येते. त्यामुळे पर्यावरणप्रेमींसाठी पर्वणी असते.**

**-विलास देगावकर,**
**पर्यावरणप्रेमी**

## आमदार महेश बालदी यांच्याकडून चौक गावाला विशेष निधी

**चौक : प्रतिनिधी**

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी विशेष निधी प्राप्त झाल्याचे चौक सरपंच रितु ठोंबरे यांनी सांगितले.

चौक हद्दीतील जांभिवली गावासाठी सामाजिक सभागृह, नानिवली या मोरबे धरणग्रस्त गावासाठी सामाजिक सभागृह, नवीन वसाहतीमध्ये अशोक खंडागळे यांच्या घरापासून ते किरण जाधव यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉँक्रिट रस्ता तयार करणे, बाजारपेठेमधील पंकज शहा ते बाजारपेठ मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉँक्रिट रस्ता तयार करणे या कामांना मंजुरी प्राप्त झाली आहे. लवकरच या कामांना सर्व प्रशासकीय बाबी पूर्ण करून विकासकामांना सुरुवात करू, असे सरपंच रितु ठोंबरे यांनी सांगितले.

त्याचबरोबर चौक परिसरातील चांभार्ली येथे सामजिक सभागृह बांधणे, आसरे येथे सामाजिक सभागृह बांधणे, ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथील मोरबे धरणग्रस्त बोरगाव बुद्रुक येथे समाजमंदिर बांधणे, ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी येथील आसरोटी गावात सिमेंट कॉँक्रिट रस्ते तयार करणे ही कामे मार्गी लागली आहेत. त्यामुळे येथील विकासकामांना गती प्राप्त झाल्याचे आढळून येते.

महावितरण

## जाहिर नोटीस

आपण श्री.वैजनाथ रामप्रसाद घोरपडे, वरिष्ठ तंत्रज्ञ (भ.नि.नि.क्र.२७११८९३) महावितरण कंपनीमध्ये पळस्पे शाखा, पनवेल २ उपविभाग, पनवेल ग्रामिण विभाग येथे कार्यरत असताना आपण दि.१४.१२.२०२२ रोजीपासुन विनापरवानगी गैरहजर आहात. त्याअनुषंगाने आपणाविरूध्द पत्र क्र. काअ/पनवेल ग्रा./मासंवि/गोप/१४४७/२०२३/१०६५९२/११६८३३ दि.१७.०४.२०२३ अन्वये आरोपपत्र बजावण्यात आले असून सदरचे आरोपपत्र आपण गैरहजर असल्याने आपल्या सेवापुस्तिकेतील उपलब्ध कायम व तात्पुरत्या पत्त्याच्या नोंदीनुसार पोस्टाद्वारे पाठविले असता सदर आरोपपत्र पाठविलेल्या पत्त्यावर आपण स्विकारलेले नाही. आपण अद्याप कामावर हजर झालेला नाहीत व आपणास पारीत झालेले कोणतेही पत्र स्विकारले नसल्याने सदर पत्र उलट टपाली या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आपणास वारंवार संधी देऊनही आपण आदेशाचे पालन करीत नाहीत. आपणास कळविण्यात येते की, हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसात आपण रुजू व्हावे. आपणास देण्यात येणारी ही शेवटची संधी असून आपण रुजू न झाल्यास आपणास पुढील एकतर्फी शिस्तभंग कारवाई अंती सेवेतून कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता तथा
सक्षम अधिकारी
महावितरण कं.लि.

# आरोग्य महाशिबिर


























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com